Rotary 2020-2021

# southern star ...अवघे धरू सुपंथ

*The official bulletin of Rotary Club of Pune South*

*Year : 51, Vol : 5, November 2020*

**IF YOU HAVE**

**FAITH**

**YOU HAVE**

**PATIENCE...**

**President :** Rtn. Sudarshan Natu | **Secretary :** Rtn. Manisha Belgaonkar | **Editor :** Rtn. Yogesh Nandurkar

## *Foundation Month*

Rtn. Abhijit Deshpande (AB)

At the 1917 convention, outgoing RI President Arch C. Klumph proposed to set up an endowment "for the purpose of doing good in the world." In 1928, it was renamed The Rotary Foundation, and it became a distinct entity within Rotary International. In 1929, the Foundation made its first gift of $500 to the International Society for Crippled Children. Today the Foundation has received contributions totalling more than $1 billion.

The Rotary Foundation is organised as a public charity operated exclusively for charitable purposes and governed by a Board of Trustees. Your generous contributions to The Rotary Foundation are essential to securing and growing Rotary programs throughout the world.

Rotary recognises donors to express gratitude for the commitment of the donors by offering individual and club recognition as well as naming opportunities that enable us to honour a friend or family member with a named or endowed gift.

The various individual recognitions available to you as donors are:

- **Rotary Foundation Sustaining Member**
  When you give $100 or more per year to the Annual Fund.
- **Benefactor**
  When you include the Endowment Fund as a beneficiary of $1,000 or more in your estate plans or when you donate $1,000 or more to the fund outright.
- **Paul Harris Fellow**
  When you give $1,000 or more to the Annual Fund, PolioPlus, or an approved Foundation grant. To recognise someone else as a Paul Harris Fellow, you can give that amount in their name.
- **Multiple Paul Harris Fellow**
  When you give additional gifts of $1,000 or more to the Annual Fund, PolioPlus, or an approved Foundation grant.
- **Paul Harris Society member**
  When you elect to contribute $1,000 or more annually to the Annual Fund, PolioPlus, or an approved Foundation grant.
- **Bequest Society**
  When you make a commitment for future gifts of $10,000 or more to The Rotary Foundation, you'll be invited to join the Bequest Society.
- **Major Donor**
  When your cumulative donations reach $10,000.
- **Arch Klumph Society**
  When your cumulative donations reach $250,000.

- **Legacy Society**
  When you promise a gift of $1 million or more to the Endowment, you'll be listed in Rotary's annual report and invited to exclusive Rotary International and Foundation events.

The generous contributions to The Rotary Foundation are essential for securing and growing Rotary programs throughout the world. The contributions are what help transform millions of lives at home and around the world.

Wouldn't you like to be a part of this global cause? So what are you waiting for, start contributing today and be a part of "doing good in the world".

**Notable Facts**

- India is ranked number 2 amongst the top giving countries worldwide. RY 2019-20 was the 5th year in a row for this ranking with a total contribution of $20.02 million.
- RID 3141(Mumbai Revenue district) is ranked number 2, across all districts worldwide in total TRF giving in RY 2019-20. RID 3131 ranked number 13 worldwide with a total contribution of $1,651,907.
- Rotary Club of Pune Central was ranked 3rd amongst the top 5 giving clubs from South Asia for RY 2019-20 with a total giving of $485,298.

**TRF Contributions as on August 2020**

| | Annual Fund | PolioPlus Fund | Endowment Fund | Other Funds | Total (in US Dollars) |
|---|---|---|---|---|---|
| District 3131 | 10,187 | 1,350 | 0 | 59,360 | 70,897 |
| India | 377,847 | 39,684 | 48,937 | 633,207 | 1,099,675 |
| South Asia Total | 412,556 | 54,995 | 49,937 | 709,140 | 1,226,627 |
| World Total | 15,321,049 | 2,503,546 | 3,119,300 | 5,240,180 | 26,184,075 |


➢ रोटरीनं प्रत्येक महिना विशिष्ट कामासाठी योजला आहे.
त्याबद्दल महत्त्व आणि काय करायचं हे सांगणारं पान
➢ शिवाय रोटरी इंटरनॅशनलबद्दल काही विशेष

रोटरी

तुमचा लेख आवर्जून द्या..
समन्वयक
योगेंद्र नातू / अभिजित देशपांडे

# Environmental e-RYLA

Rtn. Abhijit Deshpande (AB)






Agenda for 1st Environmental e-RYLA

DAY 1 : Saturday, 26th September, 2020.

| Activity | Time | Responsibility | Remarks |
|---|---|---|---|
| Meeting process, National Anthem Welcome | 2.10 to 2.15 | President | |
| Purpose Of the ERYLA | 2.15 to 2.18 | President | |
| Best Wishes by GoH | 2.18 to 2.30 | PDG Pramod Jejurikar | |
| Best wishes by DG | 2.30 to 2.40 | DG Rashmi Kulkarni | |
| Filler Activity | 2.40 to 2.43 | Sadin | |
| Intro of Key Note Speaker | 2.43 to 2.45 | Sarang | |
| KEY NOTE Address | 2.45 to 3.05 | Shri Nandkumar Gurav | Pollution And Control |
| Intro of Speaker | 3.05 to 3.07 | Atul | |
| Address by MPCB , PRO | 3.07 to 3.27 | Shri Sanjay Bhuskute | Control Actions in Action |
| Intro of Speaker | 3.27 to 3.30 | Sarang | |
| Address by Rj | 3.30 to 3.50 | RJ Sangram | Climate Crisis |
| Intro of Speaker | 3.50 to 3.52 | Prashant | |
| Address by Speaker | 3.52 to 4.30 | Mr. Rajeev Pandit | Solid Waste management with Personal skill |
| Closing Day 1 | 4.30 to 4.33 | Sadin | |



Agenda for 1st Environmental e-RYLA

DAY 2 : Sunday, 27th September, 2020.

| Activity | Time | Responsibility | Remarks |
|---|---|---|---|
| Opening and Welcome | 2.10 to 2.15 | Sudarshan | |
| Intro of Speaker | 2.15 to 2.18 | Sudarshan | |
| Address By Speaker | 2.18 to 3.00 | Dr Prasanna Jogdeo | Green infrastructure for treatment and abatement of Urban water pollution" |
| Filler Activity | 3.00 to 3.05 | Sadin | |
| Intro of Speaker | 3.05 to 3.08 | Atul | |
| Address By Speaker | 3.08 to 3.25 | Shri Dhananjay Shedbal | Tree Plantation Different aspects |
| Intro of Speaker | 3.25 to 3.27 | Rashmi | |
| Address by Speaker | 3.27 to 4.05 | Ar Dhiraj Patil | Life Outside Building |
| Certification and Declarations | 4.05 to 4.10 | Sadin | |
| Feedback from participants | 4.10 to 4.20 | Students | |
| Remarks GoH | 4.20 to 4.25 | Rtn Vishnu Mhatre | |
| Concluding remarks | 4.25 to 4.35 | PDG Vilas Jagtap | |
| Vote Of Thanks | 4.35 to 4.40 | Prashant | |

Environment is newest and the 7th focus area of Rotary International and Four Rotary Clubs in association with District 3131 RYLA team organised the 1st Environmental e-RYLA for 14 to 22 years young friends. This event was conducted over two days on the 26th & 27th September 2020



**The four Host Clubs were**

- Rotary Club of Pimpri Town - President Rtn. Sarang Matade
- Rotary Club of Dehuroad - President Rtn. Atul Kamat
- Rotary Club of Kothrud - President Rtn. Prashant Siddha
- Rotary Club of Pune South - President Rtn. Sudarshan Natu

**Synergy Partners were:**

- RC Pune Sarasbaug
- RC Walhekarwadi
- RC Lonavala
- RC Talegaon Dabhade
- RC Rajgurunagar
- RC Dehu
- RC Maval
- RC Chinchwad Morya
- RC Udyognagari




Various dignitaries and experts spoke on the occasion and introduced the participants to various aspects about the environment and how to maintain synergy with the environment in our personal and professional life. Some of the experts that spoke in the event were:




- Shri. Nandakumar Gurav - Regional Officer, MPCB - Pollution & Control
- Shri Sanjay Bhuskute - PRO, MPCB - Control Actions in Action
- RJ Sangram - RJ 95 Big FM - Climate Crisis
- Mr. Rajiv Pandit - Jividha NGO - Solid Waste Management with Personal Skill
- Dr. Prasanna Jogdeo - Co-Founder Lemnion Green Solutions - Green Infra and Urban Water
- Shri Dhananjay Shedbal - Save Trees Activist - Tree Plantation - Different Aspects
- Ar. Dhiraj Patil - Founder Principal, GSA - Life Outside Building


The first day was presided over by DG Rashmi Kulkarni and Guest of Honour was PDG Pramod Jejurikar. Guest of Honour


for the second day was Rtn Vishnu Mhatre, District Chair RYLA 2020-21 and PDG Vilas Jagtap.

Rtn. Sudin Apte conducted a very interesting enviro quiz for the participants on both days.

A total of 1650 participants registered for the event. The event was conducted online and the registration, confirmations and mailing of participation certificates was a complete online process. This was handled by Rtn. Abhijit Deshpande, IT Officer, Rotary Club of Pune South.

Overall this was a very successful event with enthusiastic participation from the student community. The event also had participation from students in Meghalay and Assam. Many participants wrote back after the event about the wonderful experience that this 1st Environmental e-RYLA has given them.





Day 1: Click here to watch...

Day 2: Click here to watch...




District 3131 recently completed 111 days of the Rotary year 2020-21. There were quite a few projects completed during these 111 days inspite of the COVID-19 restrictions.

DG Rashmi Kulkarni has congratulated all Rotarians from District 3131 for this and listed out 11 of the outstanding projects completed during this period.

Digital Guru Mantra, 1st RYLA on Environment and Hoardings about work done during COVID-19 are some of the projects where RCPS has actively participated.

## *The Four-Way Test Essay competition*

Rtn. Abhijit Deshpande (AB)




The Four-Way Test Essay competition

The Four-Way Test of the things we think, say or do is a test used by Rotarians world-wide as a moral code for personal and business relationships. The test can be applied to almost any aspect of life.




Rotary District 3131 Vocational Team 20-21 recently held The Four-Way Test Essay Competition.

The winners of this competition were announced at the prize announcement and felicitation ceremony held online on 16 Oct 2020.




Chief Guest for the event was DG Rashmi Kulkarni. The Guests of Honour were PDG Arun Kudale, PDG Mohan Palesha. All essays were also reviewed by them.

The First Prize winner was PP Rtn Govind Patwardhan and the Second Prize Winner was Ann Dr Geetanjali Purohit, both of The Rotary Club of Pune South.



You can read the winning essays below.

**First Prize - Rtn. Govind Patwardhan**
**(Rotary Club of Pune South)**




In 1980 I became a member of the Rotary Club of Pune South. My proposer was a hard core Rotarian. Initially he used to call me to ensure that I attend all club meetings. He used to talk about Rotary all the time. On one occasion he invited my attention to the second object of Rotary i.e. High ethical standards in business and professions; and coaxed me "you are invited to represent your vocation in the club. Your classification is loaned to you and you are expected to repay that loan by serving the society through your vocation. You are expected to be a role model to the younger generation". I was scared by his sermons. I was in the grip of an inferiority complex. I thought I am not fit to be a Rotarian, let me leave the organization. The Reason for such thoughts was that I was in the taxation field and the practices in those days were not compatible to what Rotary was asking me to adhere to.

I started legal practice on the taxation side in 1973. At that time the Income tax rates were very high. The highest slab of tax rate was 97%. Almost all the tax payers used to hide their income. And most tax practitioners believed that their job is to help in evading taxes by any means including illegal gratification. The atmosphere was completely vitiated and the unethical practices were justified as reaction to high rate of taxes. Various committees appointed by the Government to suggest tax reforms, concurred with the view. Some senior practitioners exhorted me that **"पाण्यात राहायचे तर माश्याशी वैर करू नये"** - Without these practices you will not survive in the profession" (probably then, I met wrong people). I was very young and was influenced by the argument and advice.

I thought, that the expectations of Rotary and the demands of my profession, contradict each other. But I continued in Rotary. In retrospect it proved to be a good decision. Then in a Rotary weekly meeting the topic was corruption. The guest speaker asked those in the audience to raise their hands who have never given any bribe. Very few hands went up. The Speaker continued, "howsoever honest you may be, it is impossible to survive in business in India without giving bribes". That incident somewhat relieved me from the burden of an inferiority complex. But introspection continued.

I used to read the magazine "The Rotarian" regularly. I came across one article on the four way test and how it has been helpful in the business. It aroused my interest. Then I read the history of the four way test. Rotarian Herbert J. Taylor first drafted this to overcome company's business. The outcome of applying the test by that company is worthy of Recapitulation.

"The application of the Four-Way Test to relations with own personnel and that of the suppliers and customers helped the company to win their friendship and good will. The company realised that the friendship and confidence of those with whom we associate is essential to permanent success in business".

Later on the FOUR WAY TEST was adopted by Rotary in 1943.

I had occasions to read corporate philosophy usually displayed near entrance of main offices of company. Most of them were lengthy and like a sermon and I found them dull. However the Four way test is short and simple but very effective which everyone can easily memorize. The test does not tell the people what they ought to do, but asks them questions. It makes you deliberate over the issue. Self-analysis leads you to find out whether the proposed actions are the right thing to do. It leads to purification of your thoughts.

I found the four way test worthy to be implemented as far as possible under the given circumstances. Initially it resulted in some financial set back. One of my clients became very angry and rudely said, "People come to you so that they can avoid taxes. For doing what is legal we don't need you". By that time I was beholden to the four way test of Rotary. I did not succumb to him and ultimately lost the client. Loss of the client was not as important than to uphold the ethical practices in my profession. The more I thought about the 4 way test, the more I found it worthy of practice. The first test is "is it the truth"

"Justice is truth in action." Said Benjamin Disraeli, a British parliamentarian. It is often realised that truth is also not absolute. It is subjective, different from person to person. Courts are meant to find out the truth. But on same facts different courts come to different conclusions. Supreme court seldom has ruled that high courts were wrong in conclusion. Though the truth may be subjective, I applied the 1st test on the principle, that "at least I should honestly believe what I think, say or do is truth from my point of view."

Second test speaks about fairness. "Is it fair to all concerned" Under the law of jurisprudence, in the case of defamation "truth is not a defence." If you intend to harm the reputation of the other person by telling the truth you can still be held guilty. The court probes whether it was fair to tell the truth or it is intended to defame. Even if something is true we must find out if it is fair to speak the truth with reference to the

occasion or circumstances. Indian concept of **न्याय** is truth and fairness together. That is what I started practicing in my life.

The first two tests are more philosophical and are in tune with the essential pillars of the judicial system and also **न्याय तत्त्व**. The other two tests are of practical utility. The Third test is "Will it build GOODWILL and BETTER FRIENDSHIPS?" It isn't rare that highly intelligent but rude people fail to gain goodwill and hardly have friends because they are too egoistic to care for the goodwill of others. It is rightly said in Manu-smruti - an ancient Indian text that 'सत्यं ब्रूयात् प्रियं ब्रूयात्, न ब्रूयात् सत्यम् अप्रियम्।।' Speak the truth. Speak what is pleasant, do not speak unpleasant truths or pleasant lies. These are Rotary ethics too. I have followed that in my everyday life.

The fourth test is "Will it be BENEFICIAL to all concerned?"

This test is an extension of the third test. For understanding and coming to a conclusion, whether the intended act is beneficial to all concerned or not, it is necessary to think about it's effects. But once you come to a conclusion that it will not be beneficial, do not think about it any further. Saying or doing anything which does not pass this test is totally ruled out.

The Four way test reminds me of a story of Socrates, the great Greek philosopher. Once an acquaintance approached him and said, "I've something important to tell you, about your friend."

Socrates said, "wait, I have three tests to ascertain, if I want to know it." The man looked puzzled but Socrates continued, "First is the test of truth. Whatever you want to tell me, have you seen or witnessed it first-hand?"

"I actually heard it from someone, a trusted source." the man said. "Socrates added, "it does not pass my first test."

"is that a good statement about my friend?" is my second test. "Not really."

Socrates interrupted, "So, you want to tell me something bad and you don't know if it's true."

"The Third filter is of utility." Socrates continued, "is your statement going to be useful to me?"

"Not really. I just wanted to share"

Socrates concluded "if the information is not necessarily true, it is not good, and, it is of no use, then, I don't want to know about it."

Rotary philosophy enunciated in the four way test is similar to what the great philosopher propounded 2,600 years ago.

Over the years I resisted any harsh words spoken or otherwise. Truth and fairness

became my way of life. I started thinking how my work can be useful to society and beneficial to all. Most literature on taxation is in English, hence not understood by many. I started writing articles in simple Marathi and ultimately authored many books. Not a profitable proposition but beneficial to all concerned. In the years to come, I gained goodwill and respect of not only my clients, employees, colleagues, friends and relatives but also of adversaries and Government officials - a difficult task indeed! It helped me in my professional career. From the feedback I receive, I believe that the younger generation in my profession look at me as a role model. My self-esteem and self-worth increased, which is very essential for peace of mind and happiness in life. I am enjoying a blissful personal, professional and social life. With conviction I can say that the intangible gains of ethical behaviour are much more than financial.

My attitude towards my life has metamorphosed. Thanks to the four way test and Rotary.

## Second Prize - Ann. Dr. Geetanjali Purohit
## (Rotary Club of Pune South)

आनंद, उत्साह आणि टाळ्यांच्या गजरात प्रचंड मोठे असे ते स्टेडीयम महोत्सवी वातावरणाने अगदी भारून गेले होते. आल्हाददायी संगीताच्या पार्श्वभूमीवर एकेका देशांचे झेंडे घेऊन प्रतिनिधी जसजसे व्यासपीठावर येत होते तसे त्या त्या देशाचे उपस्थित लोक उभे राहून मोठा जल्लोश करीत होते. भारताचा झेंडा कधी दिसतो याची आम्ही मोठ्या उत्सुकतेने वाट पाहत होतो आणि भारताच्या तिरंग्याचे दर्शन होताच ऊर भरून आला त्यावेळी जाणवलेली देशाभिमानाची शिरशिरी मला आजही स्मरणात आहे. होय! २५ जून २०१८ कॅनडातील टोरंटो येथे रोटरीच्या आंतरराष्ट्रीय अधिवेशनाचे उदघाटन होते. आपल्या अध्यक्षीय वर्षात ही संधी सोडायची नाही या निश्चयाने आम्ही पतिपत्नी तिथे उपस्थित होतो. जगभरातून ५५००० रोटेरियन या कनव्हेन्शनला आले होते. टोरंटोच्या मध्यवर्ती ठिकाणी Air Canadaच्या Ice Hokey च्या प्रचंड मोठ्या स्टेडियममध्ये असंख्य दरवाजांतून पण अतिशय शिस्तबद्ध पद्धतीने आणि अचूक वेळेत हजारो रोटेरियन स्थानापन्न झाले आणि पाहतापाहता ते स्टेडियम लोकांनी फुलून गेले होते. नंतर कार्यक्रमात रोटरीची फोर वे टेस्ट सांगण्यात आली. रोटरी मिटींगला कित्येकदा म्हटलेल्या त्याच चार ओळी त्या दिवशी म्हणताना मात्र नकळत माझे डोळे ओलावले. समाजाच्या कल्याणासाठी चाललेल्या त्या महाकार्यात आपला किमान खारीचा वाटा असल्याच्या समाधानाचा तो साक्षात्कार होता!

***Of the things you think say or do,***
***Is It The Truth ?***
***Is It Fair To All concerned ?***
***Will It Build Goodwill And Better Friendship ?***
***Will It Be Beneficial To All Concerned ?***

माझं मन क्षणात फुलपाखरू होऊन अलगद पुण्यात पोचलं. धनकवडी या पुण्याच्या उपनगरात आमचे मॅटर्निटीहोम आहे. पोलिओ निर्मूलनासाठीच्या 'Pulse Polio' या उपक्रमात आम्ही २५ वर्षांपूर्वी रोटरीबरोबर काम सुरू केले. ते दोन थेंब आमच्याही जीवनाचे 'आनंदसार' ठरतील असे तेंव्हा ध्यानीमनीसुद्धा आले नव्हते. आता वाटते की खरेतर रोटरी तेव्हाच आमच्या अंगात भिनू लागली होती... पण म्हणतात ना 'संसार करावा नेटका मग परमार्थ साधावा' आम्ही तेव्हा व्यवसायात नवीन होतो, मुले लहान होती.

कुटुंब आणि व्यवसाय हे आमचे प्राधान्य होते परंतु आपले पोट भरल्यानंतर स्वतःच्या पोटावरुन हात फिरवण्यापेक्षा दुसऱ्याच्या पाठीवरून हात फिरवण्यातील समाधान लक्षात येते त्यावेळी आजूबाजूचे जग वेगळेच दिसू लागते.

रोटरीतर्फे डॉक्टरांच्या टीमने भारतातील आणि आफ्रिकेतील अनेक पोलिओग्रस्त मुलांच्या ‘एलिझारोव्ह’ या पोलिओ करेक्टिव्ह सर्जरीज मोफत करून त्यांना नवजीवन दिले, त्यांना स्वतःच्या पायांवर उभे केले. त्याची फिल्म त्याच कनव्हेन्शनमध्ये हजारो लोकांच्या समोर दाखवली जात होती आणि आपल्या व्यवसायातून वेळ काढून ही समाजसेवा करणारे मुख्य डॉक्टर होते, माझे दीर म्हणजेच आपले पीडिजी डॉ. दीपक पुरोहित. ‘Service above self’ म्हणजे काय याचे जिवंत उदाहरण आम्ही आमच्या घरातच पाहत होतो!

लहानपणापासून आईवडील नकळत अनेक चांगल्या गोष्टी शिकवतात. मोठ्यांचा आदर करावा, एक तीळसुद्धा सात जणांत वाटून खावा, नेहमी खरे बोलावे... हे वेगळे काही नाही तर फोर वे टेस्टच आहे. त्यावेळी त्या गोष्टींचे महत्व, अर्थ आपल्याला कळत नाही. मोठेपणी आयुष्याच्या यशाचे ते धडे आहेत हे ध्यानात येते. ‘डोळ्यांनी बघतो, ध्वनी परिसतो कानी ईश्वराची दया’ हा श्लोक मुक्याबहिऱ्यांच्या दुःखाची जाणीव करून देतो हे आज कळते. समर्थ रामदास मनाच्या श्लोकांतून अतिशय मार्मिक शब्दांतून सुदृढ जीवनाचा रस्ता दाखवतात.

‘सदाचार हा थोर सांडू नये तो’।‘मना धर्मता नीती सोडू नको हो’। किंवा ‘मना अंतरी सार विचार राहो’। रोटरीची फोर वे टेस्ट देखील हेच सांगते. सद्विचारी माणसांनी आपापल्या भरलेल्या ताटातील किमान एक घास भुकेल्यांसाठी बाजूला काढला तरी जगातील अनेकांना सुखी करता येईल हे रोटरीचे तत्वच मला भावले. विविध क्षेत्रांत काम करणारी समविचारी सज्जन मंडळी एकत्र येतात, त्यातून मैत्री आणि सद्भावना वाढते. मानवतेच्या दृष्टिकोनातून समाजाच्या उन्नतीसाठी काम करण्याची प्रेरणा त्यांना आपुलकीच्या भावनेत एकत्र बांधून ठेवते तिचे नाव ‘रोटरी’... असे रोटरीचे अद्भुत रूप मला दिसले. लहानपणी आजीने सांगितलेली गोष्ट मला आठवली आणि मनात आले; शंकराच्या गाभाऱ्यात घागरीच्या घागरी दुधाचा अभिषेक केला तरी न भरणारा गाभारा मनोभावे अर्पण केलेल्या वाटीभर दुधाने भरून वाहू लागतो ना, तसेच काहीसे आणि इतकेच करायचे आहे बास!

मार्क टेलर यांनी ‘फोर वे टेस्ट’ सांगितली. कोणतीही गोष्ट करण्यापूर्वी या चार अटींची पूर्तता व्हायला हवी मगच ती करायची. मराठीत फोर वे टेस्ट सांगायची तर

‘विचार जो जो करिता मनात, जे बोलता वा आणता कृतीत ।
असे नेमकी काय त्याची कसोटी, अटी चार या ठेविल्या त्याजसाठी ।
असावी तया सत्यता निरपवाद, ठरो योग्य ते सर्व संबंधितास ।
सद्भावना मैत्र ही वाढवावे, लाभार्थीला ते हितकर ठरावे’।।

सद्विचार हे निरोगी शरीराचे आणि मनाचे द्योतक आहे. आपणच आपल्या विचारांचे द्वारपाल होऊन कोणत्या विचारांना मनात थारा द्यायचा याचा निर्णय घ्यायचा. आपल्याच विचारांचे तटस्थपणे अवलोकन करायचे. आपले मन एखाद्या कुरणासारखे आहे. कष्ट करून त्याची मशागत केली आणि अविचाराचे तण वेळीच काढून टाकले तर शांती, प्रेम, आशा, मानवता, सहानुभूतीने लगडलेली झाडे बहरतील नाहीतर क्रोध, मोह, मत्सर असे निवडुंग फोफावतील. आपल्या विचारांत नेहमी सत्यता पाहिजे; मसत्यमेव जयते’। खरेपणा आपल्यातील निष्ठा दाखवतो. समोरचा माणूस आपल्याशी प्रामाणिक राहतो. सच्चेपणा आपल्या व्यक्तिमत्वात दिसतो. साहजिकच इतर लोक आपला आदर करतात .‘‘बरे सत्य बोला यथा तथ्य चाला, बहू मानती लोक येणे तुम्हाला’’

मी व्यवसायाने डॉक्टर आहे. रुग्ण पाहताना मी त्याच्या तक्रारी ऐकायला वेळ देते, आपुलकीने बोलते. माझ्या फायद्यासाठी अनावश्यक तपासण्यांची यादी मी देत नाही. एखादा गरीब पेशंट असेल तर त्याला सवलत देते पण त्याच्या ट्रीटमेंटमध्ये कोणतीही तडजोड करण्याचा विचारही माझ्या मनात येत नाही. आजपर्यंत एकाही पेशंटचे अनावश्यक ऑपरेशन मी केले नाही या गोष्टीचे मोठे समाधान मला लाभते आणि सुखाची झोप लागते. साहजिकच या सचोटीची प्रसिद्धी मग पेशंटच एकमेकांत करतात आणि व्यवसायही वाढतो. मी माझ्या वागण्याने पेशंटच्या मनात घर करते मग हे ऋणानुबंध कायमचे होऊन जातात. ही सगळी रोटरीचीच करामत आहे. दुसरे काय?

काहीवेळा आपण अगदी सहज चारचौघात एखाद्याचा अपमान करतो. हीच गोष्ट आपल्या बाबतीत घडली तर? असा विचार केला की खरी वेदना कळते. रोटरीतच एका कार्यक्रमात करमणुकीचे खेळ ठेवले होते. प्रत्येकाला फुगवलेला एकेक फुगा आणि एक टाचणी दिली होती. सांगितले होते प्रत्येकाने स्वतःचा फुगा फुटणार नाही याची काळजी घ्यायची. ज्याचा फुगा शेवटपर्यंत टिकेल तो जिंकला! सर्वजण एकमेकांचे फुगे फोडायला टाचण्या सरसावून धावू धडपडू लागले... पण शेवटी ज्याचा फुगा उरला खरंच तो जिंकला

होता का? कोणीच कोणाच्या फुग्याला टाचणी लावली नसती तर सगळेच जिंकले असते! असा विचार करणे आणि त्याप्रमाणे वागणे म्हणजे fair to all concerned हे रोटरीने शिकवले... माझ्या हॉस्पिटलमध्ये स्टाफच्या रजांचे रोज नवे प्रॉब्लेम आणि त्यामुळे भांडणे होत. काय केलं तर ते सगळ्यांच्या हिताचे होईल आणि आम्हाला उत्तम तोडगा मिळाला. मी सर्व स्टाफला सांगितले ज्यांना जेव्हा सुट्टी हवी तेव्हा घ्या फक्त तुमच्या जागी त्यावेळी मला ड्युटीवर दुसरी व्यक्ती हवी. पेशंटच्या कामाचा खोळंबा होता कामा नये.दुसऱ्या दिवशीपासून त्यांनी आपापसात रजा ॲडजस्ट केल्या आणि माझा मोठा त्रास संपला. सुसंवाद माणसाला माणसाशी जोडत जातो. सगळ्यांचा विचार करून वागले तर माणसातील माणुसकी वाढत जाईल हे निःसंशय! गरजेच्या वेळी धावून येणारा तो खरा मित्र असतो. जात–पात, श्रीमंती– गरिबीनुसार मैत्री आणि सद्भावना बदलत नाही. दुर्दैवी घटना, आपत्ती कोणावरही येऊ शकते. अशावेळी धावून जाणारी पहिली व्यक्ती मी असेन हे रोटरी शिकवते आणि वेळ पडल्यावर तसा आचार करणाराच खरा जगन्मित्र होऊ शकतो हेही रोटरीतच पाहायला मिळते. साठवलेल्या संपत्तीपेक्षा योग्य विनिमयाने तिचे मूल्य शतगुणीत होते. स्वतःच्या गरजा क्वचित बाजूला ठेवून वेळेला केलेली मदत समोरच्याच्या मनात आपल्याविषयी विश्वास, सन्मान निर्माण करते. आयुष्याची खरी समृद्धी तीच आहे. रोटरीने विविध क्षेत्रांतील तज्ज्ञ मित्र दिले त्यामुळे एकमेकांच्या कौशल्याचा अनेकदा वैयक्तिक आणि व्यावसायिक उपयोग होतो. मैत्रीतील विश्वास, उत्तम कामाची खात्री आणि रास्त दर यांमुळे दोघांचाही फायदा होतो. रोटरीतील माझी आर्किटेक्ट मैत्रीण रश्मी; तिने माझे घर डिझाइन केले आणि ते पाहून तिला नवे प्रोजेक्ट मिळाले. मी डॉक्टर असल्याने अनेक मित्रांनी त्यांच्या परिचयातील रुग्ण विश्वासाने माझ्याकडे पाठवले. अशी अनेक उदाहरणे आहेत ज्यामुळे ही मैत्री अधिक दृढ होत गेली. ‘एकमेकां साह्य करू अवघे धरू सुपंथ’ याबरोबरच अनोळखी लोकांनाही आपण मदतीचा हात द्यायला पाहिजे; त्यांच्याशी सुसंवाद केला पाहिजे. आपले प्रसन्न व्यक्तीमत्व आणि देहबोली आपली नीतिमत्ता दाखवते जसे की रात्रीच्या प्रवासात आपली उपस्थिती एखाद्या एकट्या स्त्रीला सुद्धा आश्वासक वाटावी. सकाळी फिरायला गेल्यावर रोज भेटणाऱ्या जोडप्याला केवळ प्रसन्न चेहऱ्याने सुप्रभात म्हटल्याने काही दिवसांतच त्यांच्याशी छान मैत्री होते. एखाद्या बसप्रवासात भेटलेला अवलिया शेजारी गप्पांमधून आयुष्याचा वेगळाच दृष्टिकोन देऊन जातो. प्रत्येक ठिकाणी माझा काय फायदा? असा विचार केला तर केवळ वाद, मतमतांतरे, स्पर्धा हेच होणार... पण स्वतःबरोबर दुसऱ्याचा विचार केल्याने एकमेकांची काळजी घेणे, फायदा वाटून घेणे याने सर्वांचेच भले होईल .

या जगात इतके गरजू आहेत; मी एकटा काय करू शकतो? हा विचार साहजिकच मनात येतो पण या असंख्य गरजू लोकांपैकी एकाच्या जीवनात तरी मी बदल घडवू शकतो असा विचार करायला रोटरीने मला शिकवले. एकाने पुढे होऊन फक्त सुरुवात करायची आणि पाहतापाहता मदतीचे अनेक हात येतात हीच तर रोटरीची खासियत आहे. अनेक कल्पना, शोध, संस्था एका माणसापासूनच सुरू होतात. पॉल हॅरिस यांनी चार मित्र जमवले आणि रोटरीसारखी संस्था आज जगभरात कार्यरत आहे. काश्मीरच्या खोऱ्यात दहशतवाद्यांच्या चकमकीत अनाथ झालेल्या मुलींना आश्रय देण्यासाठी अधिक कदम हा रोट्रॅक्टर स्वतःच्या जीवाची भीती न बाळगता कूपवाडा येथे जाऊन राहिला आहे अशा प्रेरित करणाऱ्या घटना एक रोटेरियन म्हणून जगण्याचे भान देऊन जातात. अनेक संशोधक एका शोधासाठी त्यांचे आयुष्य वेचतात आणि मानवजातीसाठी अनमोल असे काही करून जातात. डॉ. साल्क यांनी पोलिओ व्हॅक्सिन शोधले आणि लाखो लोकांना पोलिओसारख्या दुर्धर रोगापासून वाचवले. जगातून पोलिओ हद्दपार करण्याची मोहीम रोटरीने हातात घेतली आणि जगातून या रोगाचे जवळजवळ समूळ उच्चाटन झाले. आता करोनाच्या महामारीतून जगाला वाचवण्यासाठीही रोटरी प्रचंड काम करते आहे हे म्हणजेच लशपळषशलळरश्र्रीं रश्रश्र!

संत ज्ञानेश्वरांनी जगाला जीवनाचे सार सांगणारा ‘ज्ञानेश्वरी’ हा ग्रंथ लिहिला. ‘सारे विश्वचि माझे घर’ म्हणून विश्वाच्या कल्याणकरिता ‘भूता परस्परे जडो मैत्र जीवाचे’ । ‘दुरितांचे तिमिर जावो’। ‘जो जे वांछिल तो ते लाहो’। असे ‘पसायदान’ मागितले. ज्ञानेश्वरांनी सांगितलेली ही सुद्धा फोर वे टेस्टच आहे. रोटरी सर्वांना सांगते; डोळे उघडून जगातील दुःखीतांकडे पहा आणि त्यांचे दुःख कमी करण्यासाठी तुम्ही स्वतः काहीतरी कृती करा कारण या वैश्विक कुटुंबातील प्रत्येकाचे दुःख आता आपलेच आहे. खरोखर ‘फोर वे टेस्ट’ म्हणजे जणू ‘परीस’ आहे. त्याचा एकदा का आपल्या विचारांना स्पर्श झाला की आपली वाणी आणि कृती सुवर्णमयी होऊन जाते हेच खरे!

# Congratulations!

## Congratulations!! DG Rashmi and PDG Vinay Kulkarni donated US$80,000



**An unique way to celebrate a birthday!!**

Rashmi and Vinay, already Arch Klumph Society Members, contributed today $80,000 via TWO Directed Gifts. The couple have vowed to enter Chair's Circle by crossing $500,000 in Total Giving

"A beneficiary of my very first Matching Grant of Polio Surgeries went on to become Car Mechanic and started earning and lived with dignity ...The Rotary Foundation had not only multiplied my donation but have transformed a life.."

\- PDG Vinay

"Our today's donation will, via Grants of Cataract surgeries, avoid blindness of more than 10,000 beneficiaries. This opportunity to serve makes TRF special to me and Vinay. It encourages us to contribute"

\- DG Rashmi

Directed Gift is contribution to Foundation of $32,000 or more. A Global Grant can be structured immediately using this gift. Contributing International Partner is not required for this Grant.

Rtn Sudin Apte
Director – Endowment & Major Gifts
Rtn Mangesh Hande
Director – Foundation Promotion

The Rotary Foundation
RID 3131
Oct 05,2020

## *Get Quickly Familiar to Rotary*




District 3131 Training Committee recently arranged an online induction program on 11th October 2020 for new Rotarians. The aim of the program was to help new Rotarians get familiarised with the various aspects of Rotary. The topics covered were

- Basics of Rotary
- Organisation and Avenues of Service
- Rotary Foundation.

The session provided an opportunity to new Rotarians to interact with senior faculty PDG Mohan Palesha, PDG Subodh Joshi and PDG Girish Gune.

Rtn. Sudin Apte-District Secretary, Events and Rtn. Shashank Inamdar-District Secretary Training had planned and organised this well-attended event.

## *Election of RI Director*

*Congratulations PDG Mahesh Kotbagi on winning the election of RI Director(2021-2023) with a good majority.*

*First Roterian of District 3131 has become a RI Director.*

*Congratulations PDG Mahesh Kotbagi, we are proud of you!*









➢ आपला क्लब रोटरी डिस्ट्रिक्ट ३१३१ मध्ये येतो.
➢ डिस्ट्रिक्ट गव्हर्नर रश्मी कुलकर्णी यांचा संवाद
➢ या डिस्ट्रिक्टमधील विविध प्रोजेक्ट्स, कार्यक्रम
➢ डिस्ट्रिक्टमधील क्लब्सचे महत्त्वाचे, दखलपात्र असे प्रोजेक्ट्स

तुमचा लेख आवर्जून द्या...
समन्वयक
योगेंद्र नातू / अभिजित देशपांडे

**डिस्ट्रिक्ट कनेक्ट**

साप्ताहिक सभा


# पांडूरंग उर्फ काका सावंत यांना श्रद्धांजली
(१९४३–२०२०)

**दिनांक: ०५ ऑक्टोबर २०२०**



रोटरी क्लब पुणे साऊथचे माजी अध्यक्ष (२००५–२००६) पांडूरंग उर्फ काका सावंत यांना २४ ऑगस्ट २०२० रोजी देवाज्ञा झाली. कै. काकांना श्रद्धांजली वाहण्यासाठी ०५ ऑक्टोबर २०२० रोजी सभा आयोजित करण्यात आली होती. काकांच्या पत्नी उमा सावंत, कन्या जाई आणि पूनम, चिरंजीव विक्रम, सून आराधना असे सगळे सावंत कुटुंबीय या सभेला उपस्थित होते.

प्रेसिडेंट सुदर्शन नातू यांनी कै. काका सावंत यांचा थोडक्यात परिचय करून दिला. पांडूरंग उर्फ काका सावंत मूळचे कोल्हापूरचे. त्यांनी सीओईपीमधून इंजिनिअरिंगची पदवी घेतली. किर्लोस्कर न्यूमॅटिक कंपनीमध्ये ते 'क्वालिटी कंट्रोल' डिपार्टमेंटला दीर्घकाळ काम करत होते. पुण्यातल्या रास्ता पेठेमध्ये 'युनिटी गेजेस' हा छोटासा कारखाना उभारून १९७०मध्ये त्यांनी उद्योग क्षेत्रात पदार्पण केले. आज कोल्हापूर आणि पुणे इथे त्यांची आठ मॅन्युफॅक्चरिंग युनिट्स आहेत. कोल्हापूर इथे त्यांनी टेक्निकल स्कूल सुरू केले आहे. २०१२मध्ये त्यांना पिंपरी–चिंचवड महानगरपालिकेतर्फे 'उद्योग भूषण' पुरस्कारानं गौरवण्यात आलं होतं.






प्रेसिडेंट सुदर्शन नातू यांनी श्रद्धांजली वाहताना काकांबरोबर केलेल्या रशिया प्रवासातल्या आठवणी सांगितल्या.

रो. पीडीजी अरुण कुदळे यांनी कुशल नेतृत्व, माणसं हाताळण्याची कला, उत्तम व्यवस्थापन अशा काकांच्या गुणांसोबतच नवीन तंत्रज्ञान शिकण्यासाठी त्यांच्यासह केलेल्या परदेश प्रवासाच्या आठवणी सांगितल्या.

रो. अनिलदा सुपनेकर यांनी काकांशी असलेल्या कौटुंबिक स्नेहाबद्दल सांगतानाच त्यांच्यासारखा मिश्कील स्वभाव असलेला आणि हळुवारपणे फिरकी घेण्याची कला अवगत असलेला उमदा धाकटा भाऊ गमावल्याची कल्पनाही अस्वस्थ करत असल्याचं सांगितलं.

रो. अनिल लोखंडे यांनी काका सावंत म्हणजे प्रसन्न व्यक्तिमत्त्व, यशस्वी उद्योजक, उद्योगविश्वातील अनुभवी व्यक्ती, सच्चे रोटेरिअन असे गुणविशेष सांगत 'प्राईड ऑफ रोटरी पुणे साऊथ' असं म्हणून श्रद्धांजली वाहिली.

रो. संदीप विळेकर म्हणाले की, माणसांची चांगली पारख असणारे काका सावंत म्हणजे अभ्यासू, उत्तम संघटन कौशल्यासोबतच कुशल तंत्रज्ञसुद्धा होते. त्यांनी रोटरी क्लबद्वारे अनेक प्रकल्प राबवले.

रो. मंदार पूर्णपात्रे म्हणाले की, काकांमुळे त्यांची रोटरीमध्ये पाळंमुळं घट्ट झाली. प्रोग्राम कमिटीमध्ये असताना काकांचा सहवास मिळाला. काकांकडे माणसं संघटित करून काम करून घेण्याचं कौशल्य होतं.

रो. डॉक्टर सुभाष देशपांडे यांनी काकांशी असलेला कौटुंबिक स्नेह, तीसपस्तीस वर्षांचा सहवास, एकत्र केलेल्या सहली अशा आठवणी सांगितल्या.

रो. नितीन पाठक यांनी काका म्हणजे आभाळाएवढं मन असलेला अस्सल कोल्हापुरी दिलदार माणूस, प्रेमळ सल्लागार, उदार दाता असं सांगत काकांच्या स्मृतींना अभिवादन केलं.

रो. गोविंद पटवर्धन यांनी काकांच्या आठवणींमध्ये उद्योजकता विकास कार्यक्रम राबवताना काकांशी मैत्री झाल्याचे सांगितले. त्यांना कर–कायद्यांची उत्तम जाण होती. आपले विचार शांतपणे, तार्किकदृष्ट्या मांडण्याची हातोटी त्यांच्याकडे होती. २००५–०६मध्ये अध्यक्ष असताना ग्रामीण भागात वॉटर कंझर्व्हेशनची कामं त्यांनी केली. त्यांच्या प्रेरणेनं रोटरीतर्फे मुळशीमधल्या एका शाळेला सायन्स मोबाईल लॅब भेट दिली होती असंही पटवर्धन यांनी सांगितले.

रो. शीतल लोखंडे यांनी काकांचं चैतन्यमय व्यक्तिमत्त्व, त्यांची तीव्र इच्छाशक्ती, त्यांचं संवेदनशील मन, जुन्या-नव्या सभासदांचा समन्वय घडवण्याची त्यांची वृत्ती असे गुणविशेष सांगून श्रद्धांजली वाहिली.

कै. काका सावंत यांचे पुत्र विक्रम यांनी रोटरी क्लबशी जुळलेले स्नेहबंध आणि सर्व सभासदांनी त्यांच्या कुटुंबाला दिलेला भावनिक आधार यांबद्दल सावंत कुटुंबीयांतर्फे आभार मानले.

व्हिडीओ इथे पहा...


## हास्य फुले अंगणी

**सादरकर्ते**

**श्री. संजय डोळे, पीपी. श्रीमती पूजा गिरी**

**दिनांक: १२ ऑक्टोबर २०२०**










१२ ऑक्टोबर २०२०च्या साप्ताहिक या सभेच्या निमित्तानं 'हास्य फुले अंगणी' या कार्यक्रमाचं आयोजन केलं होतं. सभासदांनी झूम मिटिंगद्वारे या कार्यक्रमाचा आनंद घेतला.

प्रेसिडेंट सुदर्शन नातू यांनी सर्व उपस्थितांचं स्वागत केलं. रो. मंदार पूर्णपात्रे यांनी 'हास्य फुले अंगणी' या कार्यक्रमाचे सादरकर्ते श्री. संजय डोळे आणि पी.पी. पूजा गिरी यांचा परिचय करून दिला. श्री. संजय डोळे सातत्यानं तीस वर्षं सिने-नाट्य क्षेत्रात कार्यरत आहेत. 'कुलकर्ण्यांचं स्थळ', 'आठवं पाऊल' यांसारख्या वीस व्यावसायिक नाटकांचं लेखन; 'सासूबाईचं असंच असतं' या आणि इतर पंचवीस व्यावसायिक नाटकांचं दिग्दर्शन; '१४ फेब्रुवारी', 'कशाला उद्याची बात' अशा चित्रपटांचं संवादलेखन; 'मनातले सारे', 'मु.पो. विश्रांतीनगर' या वेबसिरीजचं लेखन-दिग्दर्शन त्यांनी केलं आहे. पीपी. पूजा गिरी 'टाईम स्टुडिओ'च्या सीईओ आणि नाट्य अभिनेत्री म्हणून परिचित आहेत.

संवाद हा माणसाचा प्राण आहे. दैनंदिन जीवनात लहानसहान प्रसंगांतून विसंवाद घडत असतात. कधीकधी वाद कशावरून सुरू झाला हेच कळेनासं होतं आणि जी धमाल उडते ती 'हास्य फुले अंगणी' या कार्यक्रमातून संजयजी आणि पूजाजी यांनी आवाजातल्या चढउतारांतून खुमासदारपणे सादर केली. भाजीवाली आणि गिऱ्हाईक, रूक्ष प्रेयसी आणि काव्यमय बोलणारा प्रियकर, डॉक्टर आणि पेशंट, जाहिरात विश्वाचा परिणाम, मनशांती केंद्रातील चित्तानंद महाराज आणि शांताबाई या पात्रांच्या संवादांचं वादात होणारं रूपांतर, तंबाखूच्या व्यसनाचं महत्त्व पटवून देणारे वादातीत अण्णा अशा मिश्कील पात्रांच्या संवादांमधून हास्याची कारंजी उडत होती.

हसवता-हसवता प्रबोधन घडवणारा बहारदार कार्यक्रम सादर केल्याबद्दल रो. अतुल अत्रे यांनी श्री. संजय डोळे आणि पीपी. पूजा गिरी यांचे आभार मानले.

## ‘अनेकता में एकता’

सादरकर्ते

पुणे साऊथच्या ॲन्स आणि लेडी रोटेरिअन्स

**दिनांक: १९ ऑक्टोबर २०२०**



१९ ऑक्टोबर २०२०च्या साप्ताहिक सभेला शारदीय नवरात्रोत्सवानिमित्त ‘अनेकता में एकता’ या कार्यक्रमाचं आयोजन केलं होतं. ॲन्स चा आणि लेडी रोटेरिअन्सचा उत्स्फूर्त सहभाग हे या कार्यक्रमाचं खास वैशिष्ट्य होतं.

भारतातल्या विविध राज्यांत भक्ती–शक्तीचा संगम असलेला नवरात्रोत्सव मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. याची झलक दाखवणाऱ्या या कार्यक्रमाचं सूत्रसंचालन ॲन अस्मिता आपटे यांनी केलं. ॲन विनिता कुलकर्णी यांनी महिषासुरमर्दिनी स्तोत्र सादर करून कार्यक्रमाचा शुभारंभ केला.

पीपी. रो. सोनल पटवर्धन यांनी गोव्यातल्या नवरात्र महोत्सवाची माहिती दिली. गोव्यात श्री. शांतादुर्गा देवीचं झोपाळ्याच्या मखरात बसलेल्या पार्वतीच्या रूपात पूजन केलं जातं. यालाच ‘मखरोत्सव’ असंही म्हणतात. तो फक्त देवळांतच साजरा केला जातो.

ॲन भाग्यश्री महाजन यांनी महाराष्ट्रातली नवरात्र महोत्सवाची परंपरा सांगितली. घटस्थापना, ललितापंचमी, महाअष्टमी, महानवमी, कुमारिकांची पूजा, विजयादशमी या दिवसांमधल्या पूजा, नैवेद्य, नवरात्र साजरं करण्याचं शास्त्रीय महत्त्व, सात्त्विक आहार यांचं आणि उपवासाचं महत्त्व त्यांनी स्पष्ट केलं. ॲन डॉ. गीतांजली पुरोहित यांनी नवदुर्गामाहात्म्य, भारूड, जोगवा, गोंधळ, जागर यांची आणि व्रतवैकल्यांची माहिती दिली. तसंच सहकाऱ्यांसह त्यांनी आईचा जोगवा आणि गोंधळ नृत्यरूपात सादर केला.

ॲन माधवी देशपांडे यांनी मध्यप्रदेशातल्या नवरात्र उत्सवाचं वर्णन केलं. माळवा प्रांतात ‘संजाव्रत’ केलं जातं. महाराष्ट्रातला ‘भोंडला’ आणि ‘संजाव्रत’ यांत खूप साधर्म्य आहे. घराच्या भिंतीवर शेणाने संजाबाई देवीची रोज वेगवेगळी आकृती चित्रित केली जाते. तिला टिकल्या, रंगीत फुलं, पानं यांनी सजवतात. देवीभोवती मुली, स्त्रिया फेर धरून गाणी म्हणतात. इथे याला ‘चित्रोत्सव’ असंही म्हणतात. दसऱ्याला रावणदहन झाल्यानंतर दोन पिढ्या एकत्र सीमोल्लंघन करतात.

ॲन विजयाबेन गुजराती यांनी गुजरातमधला नवरात्रोत्सव, देवीची आणि अखंड ज्योतीची स्थापना यांबद्दल माहिती दिली तसेच साभिनय पदन्यासासह गरबा नृत्य सादर केलं. ॲनेट्स मधुरा आणि मिहीर महाजन यांनी झेंबे या तालवाद्यावर गरबा नृत्याचे बिट्स वाजवून कार्यक्रमाला रंगत आणली.

राजस्थानमध्ये साजरा होणाऱ्या दुर्गोत्सवाबद्दल ॲन सरिता अगरवाल यांनी माहिती दिली. अग्रसेन महाराजांची पूजा आणि मिरवणूक, कुलदेवीची स्थापना, कुलदेवीचा मेळा, दुर्गाष्टमीला कुमारीकापूजन, नवजात बालकाचं मुंडण, सप्तशती, रामायण यांचं पाठ्वाचन, कविसंमेलन असं कार्यक्रमाचं स्वरूप असतं. दसरा मोठ्या उत्साहात साजरा होतो.

रो. श्रुती गोरे यांनी पंजाब आणि हरियाणामधल्या नवरात्रोत्सवाची माहिती दिली. देवी सांझीपूजन, सात दिवसांचे उपवास, जागरण, भंडारा या परंपरांची माहिती दिली. ॲन इंद्रायणी पूर्णपात्रे, सुप्रिया आणि चित्रा पूर्णपात्रे यांनी पंजाब आणि हरियाणा याप्रांतांच्या स्थानिक वेशभूषेत जोशपूर्ण लोकनृत्य सादर केलं.

रो. मृदुला घोडके यांनी उत्तर–भारतातल्या नवरात्रोत्सवाचं वर्णन केलं. राजधानी दिल्लीत नवरात्रोत्सवाला साडेतीनशे वर्षांची परंपरा आहे. शक्तिप्रारूप देवीची पूजा केली जाते. विविध वयोगटांचे लोक रामलीला नाट्यरूपात सादर करतात. पंतप्रधान आणि इतर राजकीय नेत्यांच्या उपस्थितीत रावणदहन केलं जातं.

जम्मू येथील श्री वैष्णवीदेवीचं माहात्म्य ॲन स्नेहा ओगले, ॲन नंदिनी अत्रे, ॲन राधिका वाघमारे यांनी सादर केलं. ही देवी महाकाली, महालक्ष्मी आणि सरस्वती यांचं प्रातिनिधिक स्वरूप आहे. ती मातारानी, त्रिकुटा, अंबा अशा विविध नावांनी ओळखली जाते. ॲन राधिका यांनी अतिशय भावपूर्ण स्वरात ‘तूने मुझे बुलाया शेरावालीये’ हे गीत गायलं. सीमेवरच्या जवानांचा भक्तीपूर्ण आणि जोशपूर्ण नवरात्रोत्सव चित्रफितीच्या माध्यमातून दाखवण्यात आला.

रो. माधुरी किरपेकर यांनी कुलूमधल्या नवरात्रोत्सवाची माहिती गोष्टीरूपानं दिली. त्यांचा नातू शौनक पुंडे यानं जगतसिंह राजानं प्रारंभ केलेला दसरा महोत्सव साभिनय सादर केला.

ईशान्य भारतातल्या नवरात्र उत्सवाबद्दल ॲन यामिनी पोंक्षे यांनी माहिती दिली. त्रिपुरामधल्या राजघराण्याची दुर्गापूजा, नृत्य, आसाममध्ये दुर्गादेवीच्या स्वागतासाठी उभारले जाणारे भव्यदिव्य पंडाल, मेघालयातलं दुर्गापूजन, आदिवासींचं ढोलवादन, गंगटोकमध्ये स्थायिक नेपाळी लोकांचं दुर्गापूजन, नृत्य, संगीत, भोजन, मणिपुरमध्ये केलं जाणारं अठरा हातांच्या दुर्गादेवीचं पूजन, मिझोराममधलं निसर्गदेवता दुर्गादेवीचं पूजन, पंडाल, अरुणाचल प्रदेशातलं दुर्गादेवीचं पूजन, भव्यदिव्य पंडाल यांबद्दल रोचक माहिती दिली.

पश्चिम बंगालमधल्या नवरात्र उत्सवाबद्दल ॲन अंजली पाषाणकर यांनी माहिती दिली. कलकत्त्यामध्ये सिंहारूढ महिषासूरमर्दिनी दशभुजा दुर्गादेवीचा उत्सव साजरा केला जातो. आकर्षक लाईटच्या माळांनी, फुलांनी मांडव सजवले जातात. पुष्पांजली विधी, वैविध्यपूर्ण खाद्यपदार्थयुक्त नैवेद्य, घुरुची नृत्य ही या उत्सवाची खास वैशिष्ट्यं आहेत.

सेक्रेटरी रो. मनीषा बेळगावकर यांनी केरळ, तामिळनाडू, आंध्रप्रदेश, कर्नाटक इथे साजरा केल्या जाणार्या नवरात्रोत्सवाबद्दल माहिती दिली. केरळमध्ये दुर्गाष्टमीला उत्सवास प्रारंभ होतो. नवमीला आयुधं, पुस्तकं, व्यवसायाची साधनं यांची पूजा केली जाते. विजयादशमीला विद्यारंभ विधी केला जातो. तामीळनाडूमध्ये घरांसमोर, दुकानांसमोर, देवळांमध्ये विविध बाहुल्यांची सजावट केली जाते. याला 'कोळू' किंवा 'गोलू' म्हणतात. पारंपारिक वेशभूषेत टायगर नृत्य सादर करतात. आंध्रप्रदेशात बथूगम्मा पदुन्का हा नृत्यपूर्ण विधी करतात. यात महिला नृत्य करतात. कर्नाटकमध्ये घरातील देव्हार्यासमोर विविध बाहुल्यांची सजावट केली जाते. म्हैसूर दसरा जगप्रसिद्ध आहे. चामुंडेश्वरी देवी ही महिषासूरमर्दिनीचाच अवतार. या देवीची मिरवणूक काढली जाते. येथील मुलींनी गायलेलं महिषासूरमर्दिनीस्तोत्र सुश्राव्य होतं.

भारतातल्या अनेकतेत एकतेच वर्णन करणारी कविता ॲन मोहिनी नातू यांनी सादर केली. सर्व ॲन्स, लेडी रोटेरिअन्स तसंच कार्यक्रमात प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष सहभाग घेणाऱ्या सर्वांचेच फर्स्ट लेडी सुगंधा नातू यांनी विशेष आभार मानले.

## 'मीनाक्षी मंदिर'– मदुराई

**वक्त्या– डॉ. संगीता महाजन**

**दिनांक: २६ ऑक्टोबर २०२०**

२६ ऑक्टोबर २०२०च्या साप्ताहिक सभेसाठी 'मीनाक्षी मंदिर', मदुराई या विषयावर डॉ. संगीता महाजन यांचं व्याख्यान आयोजित केलं होतं.



प्रेसिडेंट सुदर्शन नातू यांनी सर्व उपस्थितांचं स्वागत केलं. रो. डॉ. संगीता देशपांडे यांनी डॉ. संगीता महाजन यांचा परिचय करून दिला. डेंटिस्ट असलेल्या डॉ. संगीता महाजन दंतवैद्यक क्षेत्रात सातत्यानं एकोणतीस वर्षं कार्यरत आहेत. भारताचा सांस्कृतिक आणि धार्मिक इतिहास जाणून घेण्यासाठी त्यांनी 'इंडॉलोजी' विषयात एमए ही पदवी तसंच डेक्कन कॉलेजमधून 'आर्किओलॉजी' या विषयात एमफिल ही पदवी संपादन केली आहे. इतिहासाचा सखोल अभ्यास करता यावा म्हणून त्या उर्दू, पर्शियन, चायनीज या भाषा शिकल्या आहेत.

भारतातील मंदिरं बांधण्याचा पहिल्या शतकापासूनचा इतिहास डॉ. संगीता महाजन यांनी सांगितला. हिंदुधर्माच्या पुनरुज्जीवनासाठी आणि शैव, वैष्णव, शाक्त, सौर, गाणपत्य या पाच पंथांमधील संघर्ष टाळण्यासाठी शंकराचार्यांनी एक संकल्पना मांडली. त्यानुसार आराध्य दैवतेचं मंदिर मध्यभागी आणि त्याभोवती इष्ट देवतांची मंदिरं बांधावीत असं सुचवलं. त्यानुसार मदुराईमधल्या मीनाक्षी मंदिराची रचना केलेली आहे. हे शहर पुराणकाळापासून अस्तित्वात आहे. सहाव्या शतकापासून याच्या अस्तित्वाचे ठोस पुरावे मिळतात. पंड्या, चोला, विजयनगर साम्राज्य,

नायक, चंदासाहेब आणि अखेरीस ब्रिटिशांनी या शहरावर राज्य केलं. इथे तमिळ विद्वानांची संमेलनं होत असत. मदुराई शहर कुडाल, कदंबवनम् म्हणूनही ओळखलं जात होतं.




विविध अभ्यासकांनी 'मीनाक्षी' या शब्दाचे अनेक अर्थ सांगितले आहेत. मासा ज्याप्रमाणे डोळे कधीही मिटत नाही त्याप्रमाणे माशासारखे डोळे असलेली ही मातृदेवता भक्तांच्या रक्षणासाठी सतत जागृत असते. डॉ. संगीता महाजन यांनी या देवीच्या स्थापनेमागची देवी पार्वतीची सखी विद्यावतीची आख्यायिका सांगितली. मीनाक्षी देवी मातृसत्ताक-पद्धतीचं प्रतिक आहे.

अतिशय नियोजनबद्ध अशा मदुराई शहरातल्या मीनाक्षी मंदिराला पूर्व, पश्चिम, उत्तर आणि दक्षिण या दिशांना दरवाजे आहेत. बाराव्या शतकात पुलशेखर पंड्या राजाने गोपुरांची बांधणी केली. सोळाव्या शतकात विश्वनाथ नायक याने शिल्पशास्त्रानुसार या मंदिराची पुनर्बांधणी केली. उंच संरक्षक भिंती असणाऱ्या या मंदिराच्या अंतर्भागात मीनाक्षी देवी आणि तिचा पती सुन्देश्वर तसेच नटराज, सूर्य, कार्तिकेय, गणपती यांची मंदिरं आहेत. इथे अनेक शिल्पं असलेली चौदा उंच गोपुरं आहेत. एकशे सत्तर फूट उंच असलेलं एक आणि अनेक लहान गोपुरं, लोटस टँक, सुरसुंदरी, व्याल, रावणानुग्रह, गजलक्ष्मी, मोरावर बसलेला षण्मुगम इत्यादी तेहतीस हजार शिल्पं आणि अनेक भव्य प्रसादांसोबतच हजार खांबांचा एक प्रासाद यांसर्व गोष्टी मंदिराच्या परिसरात आहेत. मुळात दगडी बांधकाम असलेल्या या मंदिरावर विविध राज्यकर्त्यांनी त्यांच्या अभिरुचीनुसार रंगकाम केलं. गोपुरांवर पुराणकथा कोरलेल्या आहेत. कल्याणसुंदराच्या मूर्तीला अनन्यसाधारण महत्व आहे. इथल्या रस्त्यांची रचना उमललेल्या कमळाप्रमाणे दिसते.

डॉ. संगीता महाजन यांनी मदुराईच्या मीनाक्षी मंदिराची अभ्यासपूर्ण आणि उत्कंठावर्धक माहिती दिल्याबद्दल पीपी. गोविंद पटवर्धन यांनी आभार मानले.

व्हिडीओ इथे पहा...

## 'ये रे घना'

**सादरकर्ते - रो.नीलम बेंडे, रो.सतीश खाडे, रो.हर्षवर्धन भुसारी आणि सहकलाकार**



कोजागरी पौर्णिमेचं औचित्य साधून ३० ऑक्टोबर २०२०च्या साप्ताहिक सभेसाठी रोटरी क्लब पुणे साऊथ, रोटरी क्लब लक्ष्मी रोड आणि रोटरी क्लब कर्वेनगर या तीन शाखांच्या संयुक्त विद्यमाने रो.सतीश खाडे आणि रो.नीलम बेंडे निर्मित 'ये रे घना' हा कार्यक्रम आयोजित केला होता.

रोटरी क्लब पुणे साऊथचे प्रेसिडेंट रो.सुदर्शन नातू यांनी सर्व उपस्थितांचं स्वागत केलं. रोटरी क्लब लक्ष्मी रोड शाखेचे प्रेसिडेंट रो.चंद्रशेखर फडके यांनी रो.नीलम बेंडे, रो.सतीश खाडे, रो.हर्षवर्धन भुसारी यांचा परिचय करून दिला.

रो.नीलम बेंडे 'नील मल्टी-इव्हेंट्स' या संस्थेच्या संस्थापक आहेत. या संस्थेतर्फे स्वरांजली, इंद्रधनू, स्वरलहरी, चैत्रपालवी, ये रे घना असे निवडक हिंदी, मराठी गीतांचे विविध कार्यक्रम सादर केले जातात. 'ॐकार साधना', 'गान तपस्या' असे काही

सेमिनार्ससुद्धा रो.नीलम बेंडे घेतात.



रो.सतीश खाडे भारतीय जलसंस्कृती मंडळ, पुणे शाखेचे अध्यक्ष आहेत. 'पाणी' या विषयावर त्यांचा सखोल अभ्यास आहे. पाणी वाचवणे, साठवणे, शुद्ध पाणी देणे आणि अशुद्ध पाणी रिसायकल करणे यांसाठी त्यांनी अनेक प्रोजेक्ट केले आहेत. 'पाणी वाचवा' हे जनजागरण अभियान ते अथकपणे करत असतात.

रो.हर्षवर्धन भुसारी हे सर्टिफाईड फायनान्शिअल प्लॅनर आहेत. एक कोटी लोकांपर्यंत 'फायनान्शिअल अवेअरनेस' पोहोचवण्याचं उद्दिष्ट ठेवत या विषयासाठी ते अनेक सेमिनार घेतात. ते उत्तम गायक आहेत. रोटरीच्या गीतगायन स्पर्धेमध्ये त्यांनी अनेक पारितोषिकं पटकावली आहेत.

जलसाक्षरता आणि पर्यावरण संरक्षण यांविषयी रो.सतीश खाडे यांचं शैलीदार निवेदन आणि त्यानंतर रो.नीलम बेंडे आणि सहकारी यांचं सुरेल गीतांचं सादरीकरण असं 'ये रे घना' या कार्यक्रमाचं स्वरूप होतं. रो.सतीश खाडे यांनी पाणी आणि जीवसृष्टी यांचं अतूट नातं समजावून सांगितलं. भारतीय भूभाग तिन्ही बाजूंनी पाण्यानं वेढलेला आहे. अनेक नद्या, उपनद्या आहेत तरीही जलसंवर्धनाचं महत्त्व लक्षात न आल्यानं देशात पिण्याच्या पाण्याची वानवा आहे. जलप्रदूषण, त्यामुळे नष्ट झालेल्या गोड्या पाण्यातल्या बारा टक्के आणि खाऱ्या पाण्यातल्या सात टक्के जैव प्रजातींबद्दल, पाण्यातली इकोसिस्टीम, विशिष्ट झाडांची मुळं आणि बुरशी वापरून केलेले जलशुद्धीकरण प्रयोग या सगळ्याबद्दल माहिती दिली.

रो.सतीश खाडे यांनी पाणी साठवण्यासाठी अभ्यासपूर्ण उपायोजना सांगितल्या. त्यांनी रोटरीच्या माध्यमातून ग्रामीण भागातल्या 'शंभर कुपनलिका पुनर्भरण प्रकल्प' हाती घेतला आहे. त्यांनी वॉटर फुटप्रिंट, ऑरगॅनिक मटेरिअलची निर्मिती आणि वापर, एरिएटर्सद्वारे पाण्याची बचत अशा संकल्पना सांगितल्या. संवेदनशील पुणेकरांनी घरोघरी एरिएटर्स बसवून उत्तम प्रतिसाद दिल्याचं सांगितलं. दैनंदिन जीवनशैलीवर आधारित पाण्याचा सुयोग्य वापर यावर अधिक विचार आणि कृती होणं आवश्यक आहे.

रो.नीलम बेंडे यांनी गायलेल्या 'काली घटा छाए' या गीतानं बहारदार सुरुवात झाली. 'ओ घटा सावरी...' हे गीत मुग्धा इनामदार यांनी गायलं. दीपक महाजन आणि रो.नीलम बेंडे यांनी 'ये राते ये मौसम नदी का किनारा' हे गीत गायलं. 'गरजत बरसत सावन आयो रे' हे गीत सोनाली नांदुरकर आणि मुग्धा इनामदार यांनी गायलं.

रो.नीलम बेंडे यांनी रो.हर्षवर्धन भुसारी यांच्या साथीने 'याद किया दिलने कहाँ हो तुम' हे गीत, रो.हर्षवर्धन भुसारी यांनी 'एक लडकी भीगी भागी सी', 'मेरे सामनेवाली खिडकी में', 'बदन पे सितारे लपेटे हुए' ही अजरामर गीते गायली. 'ऐसी दीवानगी देखी नही कहीं' मुग्धा इनामदार आणि रो.हर्षवर्धन भुसारी यांनी गायलं. सोनाली नांदुरकर यांनी गायलेल्या 'ऋतू हिरवा ऋतू बरवा' या सुरेल गीतानं कार्यक्रमाची सांगता झाली.

रो.सतीश खाडे यांनी पाण्याच्या संवर्धनासाठी आणि नियोजनासाठी लिहिलेली पाण्याविषयीची प्रतिज्ञा रोटरी क्लब पुणे साऊथ, रोटरी क्लब लक्ष्मी रोड आणि रोटरी क्लब कर्वेनगर या तीनही शाखांच्या प्रेसिडेंट्सनी आपापल्या क्लबच्या वतीनं घेतली.

'ये रे घना' कार्यक्रमातून जलसंवर्धनासारखा रूक्ष विषय रो.सतीश खाडे, रो.नीलम बेंडे आणि सहकारी यांनी रंजकतेनं सादर केल्याबद्दल रोटरी क्लब कर्वेनगरच्या प्रेसिडेंट रो.आकांक्षा पुराणिक यांनी आभारप्रदर्शन केलं.

➢ **क्लबच्या साप्ताहिक सभांचा सभेनुसार गोषवारा**

**साप्ताहिक सभा**

**तुमचा लेख आवर्जून द्या...**
**समन्वयक**
**एके / यामिनी पोंक्षे**

## LITERACY WEEK CELEBRATION-DISHA










DISHA was a literacy program organized by RCP Kalyaninagar and RCP South was one of the synergy partner. Under this program, a series of workshops was arranged. A variety of subjects were addressed. The program was well received and well appreciated.

Below is the list of workshops conducted under DISHA.

- *Women social entrepreneurship*
- *New Tax Regime*
- *Power of savings & value of money with Subbu stories.*
- *60 Minutes to Linked-In Success*
- *Fitness & Preventive Medicine*
- *Consumer Rights*
- *Cyber Suraksha*

Click here to watch...

## कायाकल्प

रो. प्रेसिडेंट सुदर्शन नातू





रोटरी क्लब ऑफ पुणे साऊथतर्फे दिनांक ३१ ऑगस्ट २०२० रोजी एक विशेष उपक्रम राबवण्यात आला. पुण्यातील रेडलाईट भागातील महिलांकरता आणि त्यांच्या मुलांकरता काम करणाऱ्या 'कायाकल्प' या संस्थेच्या आरोग्य-सेवकांना पीपीई किट्सचं तर त्या भागातील देहविक्रय करण्याऱ्या महिलांसाठी आरोग्य विषयक वस्तुंचं वाटप करण्यात आलं. संस्थेच्या संचालिका सौ सीमा वाघमोडे आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी ही मदत स्वीकारली.

या उपक्रमासाठी रो. मृदुला घोडके आणि त्यांची मुलगी सौ. अनुश्री आठले यांनी संपूर्ण आर्थिक मदत दिली. त्याबद्दल त्यांचं मनःपूर्वक आभार आणि अभिनंदन.

या कार्यक्रमाला प्रे. सुदर्शन नातू, फर्स्ट लेडी अँन सुगंधा, प्रे. ई. रो. अतुल अत्रे, पब्लिक इमेज अव्हेन्यू डायरेक्टर रो दत्ता पाषाणकर, कमिटी चेअरपर्सन रो. मृदुला घोडके, रो. सुभाष चौथाई हे सर्वजण उपस्थित होते.

या कार्यक्रमाचा रेडिओ वृत्तांत आकाशवाणी पुणे केंद्राच्या 'पुणे वृत्तांतमध्ये' सायंकाळी सहा वाजता सादर झाला. अंदाजे चार ते पाच लाख लोक हे बातमीपत्र रोज ऐकतात.

आकाशवाणीच्या फेसबुक पेजवरही बातमी प्रकाशित झाली आहे.

## गोमाता दान

रो. प्रेसिडेंट सुदर्शन नातू

नमस्कार मंडळी

रोटरी पुणे साऊथ क्लबतर्फे वेल्हे तालुक्यातील पासली जवळील गरीब शेतकरी कुटुंबांना जोड उत्पन्नाचं साधन निर्माण करून त्यांचं दीर्घकालीन राहणीमान वाढवावं असा विचार करून आपण एक प्रकल्प राबवणार आहोत. त्याची पूर्व तयारी आपण गेली काही महीने करत आहोत. या प्रोजेक्टमध्ये प्रत्येक गरजू शेतकरी कुटुंबाला एक गाय दान केल्यामुळे त्यानां त्या गायीपासुन दूध, तूप, शेण आणि गोमूत्र यांच्या विक्रीतून तसेच पुढे वाढणार्या गो-धनामुळे जोड-उत्पनाचं साधन निर्माण होणार आहे. त्याचबरोबर कुटुंबातल्या सदस्यांचं आरोग्यपण सुधारेल.

त्या भागातील भौगोलिक परिस्थिती लक्षात घेऊन कोणती गाय दिली पाहिजे याचं योग्य मार्गदर्शन तज्ज्ञांकडून आपल्याला मिळालं आहे. या विषयातील दोन तज्ज्ञ आपल्यासोबत आहेत. पाऊलवाट फौंडेशनच्या आशिष क्षीरसागर यांनी याचे प्राथमिक प्रयोग यशस्वीरित्या राबवले आहेत.

रोटरी पुणे साऊथच्या पासली इथल्या ग्रामीण कौशल्य विकास केंद्रामार्फत हा प्रोजेक्ट राबवण्यात येईल. उत्पादनांच्या मार्केटिंगचंसुद्धा मार्गदर्शन आपल्याला मिळणार आहे.

आपण कमीतकमी पन्नास गायी दान देण्याचं उद्दिष्ट ठेवून त्यादृष्टीनं काम करत आहोत.

आपल्या क्लबच्या सभासदांना या प्रोजेक्टमध्ये सहभागी होऊन गो-दान करण्याचं आवाहन करत आहोत. आपण आपल्यातर्फे तसंच आपल्या मित्रमंडळींतर्फे कमीतकमी एक गाय दान म्हणून द्यावी. गो-दानाचं पुण्य अमाप आहे आणि ते सत्पात्री झाल्याचं समाधान तुम्हाला लाभेल. अधिक मास, नवरात्र, दसरा, दिवाळी या सणांच्या निमित्ताने आपण गो-दान संकल्प सोडावा असं नम्रपणे आवाहन करतो. एका गायीची किंमत साधारण तीस हजार रुपये आहे. आपल्याकडून पंचवीस हजार प्रति गाय इतकी रक्कम अपेक्षित आहे. आपल्या परिचयाचे दाते असल्यास त्यांनाही क्लबतर्फे आवाहन करा.

आपली इच्छा आपण मला, रो. नितीन पाठक, पीपी. रो. गोरे सर यांना कळवावी.

आम्ही संकल्प केला आहे - तुम्हीपण सहभागी व्हा.

## RESPONSES




## Synergy Airport Club Meeting

*IPL fever...*


*47 clubs came together....*






## आभाळमाया वृद्धाश्रमाला मदत



ARPAN SOCIAL AND WELFARE FOUNDATION

प्रति, Sanjeev D. Ogale
Rotary Club of Pune South

नमस्कार,

धन्यवाद,

आभाळमाया वृद्धाश्रम

## वृक्षसंवर्धनाला मदत

**रो. मिलिंद, गौरी आणि त्यांचे शेजारी श्री. आणि सौ. मोघे यांनी चांबळीला भेट दिली. त्यावेळी त्यांची तेथील वृक्षरक्षक श्री. कटके यांच्याशी भेट झाली. आपण करत असलेली मदत आणि कामाचा प्रोग्रेसपण समजला.**

व्हिडिओ १– वृक्षसंवर्धनाला मदत व्हिडिओ पाहण्यासाठी क्लीक करा......

व्हिडिओ २– वृक्षसंवर्धनाला मदत व्हिडिओ पाहण्यासाठी क्लीक करा......

व्हिडिओ १– वृक्षसंवर्धनाला मदत व्हिडिओ पाहण्यासाठी क्लीक करा......

# कविता अभिवाचन– एक अनुभव

रो. श्वेता करंदीकर

माझे वडील श्री. श्रीनिवास देशपांडे, छोट्या–छोट्या कविता करायचे. कुणालाही पाकिटातून पैसे देताना पाकिटावर त्या माणसाचे गुण हेरून एक चारोळी लिहायचे आणि मगच पाकीट द्यायचे. आता बाबा नाहीत. ते सात वर्षांपूर्वी गेले आणि जाताना ती कला मला देऊन गेले. मी बाबा गेल्यापासूनच कविता करायला सुरुवात केली.

मनात चालू असलेली खळबख जोपर्यंत कागदावर उतरत नाही तोपर्यंत चैन पडत नाही. कधीकधी दोन–दोन महिने काही लिहीत नाही तर कधीकधी सलग लिहिल जातं.कविता लिहिल्या असल्या तरी स्पर्धेसाठी त्यांचं अभिवाचन कधीच केलं नव्हतं.



रोटरी क्लब पुणे साऊथची मेंबर असलेल्या ॲन विशाखा वेलणकरमूळे, 'महाराष्ट्र कल्चरल क्लब' आयोजित खुल्या मराठी कविता अभिवाचन स्पर्धेविषयी आम्हाला कळलं.

मी, ॲन. गौरी क्षीरसागर, रो. मृदुला घोडके आणि रो. योगेश नांदूरकर असा संच तयार झाला. विषयाची निवड झाली आणि प्रे. सुदर्शन यांनी आमच्या 'रोटरी क्लब पुणे साऊथ' संघाचे नाव स्पर्धेसाठी दिलं.



संहितेचं नाव ठरलं – 'कवितेतील ती'

कविता निवडल्या गेल्या.

लहानपणापासूनचा स्त्रीचा प्रवास दाखवून, तिच्या आयुष्यातील अनेक चढउतार दाखवणाऱ्या कविता निवडल्या गेल्या.

मला स्वतःला कविता निवडीची प्रोसेस खूप आवडली. त्या निमित्तानं खूप कविता शोधल्या गेल्या. त्याच्याशी निगडित काही व्हिडिओ पाहिले गेले.

रो. मृदुला घोडके यांनी अप्रतिम संहिता लिहिली आणि कविता एकमेकांना जोडल्या गेल्या.



कोरोनाच्या पार्श्वभूमीवर एकत्र भेटणं शक्य नव्हतं म्हणून झूमवर प्रॅक्टिस सुरू केली. आम्हा चौघांचा एक मस्त ग्रुप बनला. सर्वांची विचार करण्याचीपद्धत एकसारखी असल्यामुळे मजा येत गेली. एकदा रो. आनंद बदामीकर यांनी त्यांच्या 'कलाप्रसाद कार्यालयात' जागा उपलब्ध करून दिल्यामुळे एकत्र भेटूनही तालीम केली. गौरीने आणलेल्या ढोकळ्याचा स्वाद घेतला.

स्पर्धेच्यादिवशी आमचे आणि विशाखाचे (तिने दुसऱ्या संघातून भाग घेतला होता) मनोबल वाढवण्यासाठी प्रेसिडेंट सुदर्शन आणि फर्स्ट लेडी सुगंधा आवर्जून आले होते.

परीक्षक म्हणून डॉ. वंदना बोकील, अमित वझे आणि प्रमोद काळे यांनी काम पाहिले. आमचं सादरीकरण छानच झाले.

काही त्रुटी जाणवल्या पण पहिलाच अनुभव असल्यामुळे खूप काही शिकायला मिळालं.

या स्पर्धेमध्ये मला कविता अभिवाचनाचं उत्तेजनार्थ पारितोषिक मिळाले. अंतिम स्पर्धेच्या दिवशी कवी संदीप खरे यांच्या हातून मी ते स्वीकारले. विशाखाच्या संघालाही उत्तेजनार्थ पारितोषिक मिळालं.

आरसीपीएस संघ अंतिम फेरीमध्ये जाऊ न शकल्याची खंत नक्कीच वाटत आहे.

राहिलेल्या त्रुटी भरून काढून पुढच्या वर्षी बाजी नक्कीच मारू.

'कविता अभिवाचन' हा प्रकार आपल्याला आनंद देऊन जातोय आणि आनंद मिळवण्यासाठी अजून एक दार आपल्यासाठी उघडलं आहे याची जाणीव मात्र नक्की झाली.

## *Distribution of Grocery Kits to HIV Patients*

Dear Rotarians and Anns,

As you all know, for the past 15 years we have been distributing grocery kits to 15 HIV patients, as they are not able to earn their living. This has been possible because of your contributions. The cost of these kits works out to about Rs.10,000/- per month. I request you all to donate generously to this noble cause.


Thanking you.

Ann. Swati Velankar

Chairperson HIV Committee

## *Happy Family Kit*

As a part of Pancham project, we donated six happy family kits to the beneficiaries of remote villages in Velhe. These two are from Balvad village- Mrs Baijabai and Mrs Rakhamabai's son.




- अध्यक्ष सुदर्शन संवाद
- विविध विभाग संचालक किंवा कमिटी मुख्य संवाद
- क्लबमधील विविध प्रोजेक्ट्स, कार्यक्रम, फेलोशिप्स
- जावे त्यांच्या क्षेत्रा.../ मागील एखाद्या प्रोजेक्टची गोष्ट

**क्लबकारी**

तुमचा लेख आवर्जून द्या....

समन्वयक

आनंद / यामिनी

# दशावतार आणि उत्क्रांती (भाग ३)

रो. डॉ. सुभाष देशपांडे

दशावतार म्हणजे भगवान विष्णूंनी जग तारण्यासाठी घेतलेले दहा अवतार मत्स्य, कुर्म, वराह, नरसिंह, वामन, परशुराम, राम, कृष्ण, बलराम किंवा बुद्ध आणि येणारा कलकी असे आहेत.

हिंदू पौराणिक पंचांगानुसार पृथ्वीचा कालखंड चार युगांत विभागला आहे. ही युगं चक्राकारपद्धतीनं एका पाठोपाठ येत राहतात.

प्रत्येक युगात दशावतारांपैकी काही अवतार प्रगट झाले आहेत. एका अवताराच्या समाप्तीनंतर दुसरे युग चालू होते. दशावतार सर्व प्रथम जयदेव यांनी सर्वांना माहिती करून दिले.

पौराणिक पंचागानुसार सर्वप्रथम सत्ययुग चालू होते. हे सर्वात श्रेष्ठ युग म्हणून समजले जाते. हे युग त्यातील सत्य आणि निर्दोषपणासाठी ओळखलं जाते. या युगात अपराध अजिबात होत नसत आणि सर्वजण कनवाळू होते. हे युग अडतीस लाख त्र्याण्णव हजार एकशे वीस वर्षांपूर्वी सुरू झालं आणि सतरा लाख अठ्ठावीस हजार वर्षांपूर्वी संपलं. या युगात मत्स्य म्हणजे मासा, कूर्म म्हणजे कासव आणि वराह म्हणजे डुक्कर हे अवतार प्रगट झाले. पृथ्वीवर जीवांची सुरूवात समुद्रात झाली. समुद्रातला मुख्य प्राणी म्हणजे मासा म्हणून त्याला प्रथम अवतार मानलं जातं. ऋगवेदात मत्स्यावताराचा उल्लेख आहे. मनूच्या काळात आलेल्या महापूरात मनूची होडी मत्स्याने ओढून हिमालयात नेली आणि मनूच्या होडीतील सर्व प्राणीमात्रांचे जीव वाचवले. या महापूराची आणि होडीची वर्णनं बायबल, कुराण, फार पुर्वीच्या मेसोपोटेमीया इथल्या महापूरात अगदी चार हजार वर्षांपूर्वीच्या बॅबिलॉन काळातसुद्धा झाली आहेत. ब्लॅव्हॅटसूकी यांनी मत्स्यावतार हा पॉलिओझोईक काळातील उत्क्रांतीशी संबंधीत आहे असं प्रतिपादन केलं आहे. हा काळ पंचवीस ते चौपन्न कोटी वर्षांपूर्वीचा आहे.

कूर्म अथवा कासव हा दुसरा अवतार. या अवताराचा उल्लेख यजुर्वेदात आहे. समुद्र मंथनाच्या वेळी मंदार पर्वत समुद्रात बुडू नये म्हणून कूर्म त्या पर्वताला आपल्या पाठीचा आधार देतो. उत्क्रांतीमधे पॉलिओझोईक (चौपन्न ते एकशे पंचवीस कोटी वर्षांपूर्वी) आणि मेसोझोइक (पंचवीस ते सहा कोटी साठ हजार वर्षं) यांकाळात समुद्रातील काही प्राणी सरपटत जमिनीवर आले. त्यांच्यापासून उभयचर प्राण्यांची म्हणजे सुसर, मगर आणि कासव यांची उत्पत्ती झाली.

तिसरा अवतार म्हणजे वराह अवतार. हापण सत्ययुगात झाला.

वराह म्हणजे डुक्कर. हिरण्यक्ष राक्षस पृथ्वीवर अत्याचार करत होता. तो पृथ्वीला पळवून नेतो आणि पुरातन वैश्विक समुद्रात फेकून देतो. वराह हिरण्यक्षशी संघर्ष करून त्याला पराभूत करतो आणि आपल्या सुळ्यांनी भूदेवीला समूद्रातून बाहेर आणून तिच्या विश्वातील योग्य जागेवर बसवतो अशी एक पौराणिक कथा आहे. उत्क्रांतीमध्ये सेनोझोईक काळात पृथ्वीवर अनेक प्राणी होते. त्यांत महाकाय डायनॉसॉरस्, उडणारे पक्षी आणि सरपटणारे किंवा चार पायांवर चालणारे छोटे सस्तन प्राणी होते. डायनॉसॉर्स जमिनीवर राहून झाडपाला खात असत. छोटे सस्तन प्राणी मुख्यत्वे करून जमिनीखाली बिळात राहत असत. सेनोझोईक काळ सहा कोटी साठ हजार वर्षांपूर्वीपासून सुरू झाला तो आजपर्यंत चालू आहे. साधारण साडेसहा हजार कोटी वर्षांपूर्वी एक प्रचंड मोठी उल्का पृथ्वीवर आदळली. त्या धक्यानं हवेत धुराळा उडून पृथ्वी धूराळ्यानं झाकून गेली. पृथ्वीवरंच हवामान बदललं आणि जमिनीवरचे महाकाय डायनॉसॉर्स नष्ट झाले. पाण्यात राहणारे प्राणी, हवेत उडणारे पक्षी आणि जमिनीखाली बिळात राहणारे सस्तन प्राणी वाचले. डायनॉसॉर्सशी स्पर्धा संपल्यामुळे लहान सस्तन प्राण्यांची भरभराट झाली. त्यानंतर मानवाची निर्मीती झाली. डुक्कर हे सस्तन प्राण्यांचं प्रातिनिधिक स्वरूप आहे.

सत्ययुगातला शेवटचा अवतार म्हणजे नरसिंह अवतार होय. नरसिंहाचं अर्ध शरीर मानवाचं आणि अर्ध शरीर सिंहाचं आहे.

हिरण्यक्षाचा धाकटा भाऊ हिरण्यकशपूचा वध करण्यासाठी प्रगट झालेला हा अवतार आहे. 'ना मनुष्य, ना पशू' असलेल्या नरसिंहानं 'ना दिवसा, ना रात्री' म्हणजेच सायंकाळी 'ना बाहेर, ना आत' म्हणजे उंबरठ्यावर हिरण्यकशपूला मारले. उत्क्रांती वादात हा अवतार सेनोझोईक काळात मोडतो. पन्नास ते सत्तर लाख वर्षांपूर्वी पृथ्वीवरील हवामान थंड होण्यास सुरवात झाली आणि अफ्रिकेतल्या घनदाट अरण्याची जागा गवताळ प्रदेशांनी व्यापल्यामुळे झाडांवर राहणारे आपले पुर्वज जमिनीवर उतरले. ही घटना साधारणपणे वीस ते चाळीस लाख वर्षांपूर्वी घडली.

हे पूर्वज कमी उंचीचे, केसाळ आणि दिसायला रानटी होते. सोळा लाख वर्षांपूर्वी आपले पूर्वज दोन पायांवर उभे राहू लागले. एक लाख ते अठरा हजार वर्षांपूर्वीपर्यंत आपले पूर्वज सर्व पृथ्वीवर पसरले. नरसिंह अवतार हा आपल्या रानटी पूर्वजांचे प्रतिनीधी असावा...

(क्रमशः)

# ‘वाई’– अ हॉट डेस्टिनेशन

ॲन. कांचन आनंद बदामीकर

‘वाई’– अ हॉट डेस्टिनेशन ऐकण्यासाठी क्लीक करा......

काही दशकांपूर्वी ‘पेन्शनर्स’चं शहर म्हणून पुण्याची ओळख होती... पण आयटी कंपन्यांनी इथं आपलं बस्तान बसवलं आणि पुण्याचा कायापालट झाला. आता ही ओळख मवाईफगावाला मिळाली आहे.

सातारा जिल्ह्यात ‘वाई’ नावाचं लहानसं गाव आहे. अवघी तीस ते पस्तीस हजार लोकसंख्या आणि पस्तीस किलोमीटरमध्ये हे पसरलेलं, उंचच उंच डोंगरांच्या कुशीत वसलेलं हे गाव पुण्यापासून अवघ्या नव्वद किलोमीटरवर आहे. अतिशय शांत आणि अजूनतरी आपली मराठी संस्कृती जपलेलं हे गाव. पुरातत्त्व संशोधकांच्या मते वाई नगरी दोन हजार वर्षांपूर्वीची. साधारणपणे इ.स. आठव्या शतकात वाई हे गाव होतं आणि त्याला ‘वायी’ असं म्हणायचे. हे नाव ‘वाय’ म्हणजेच विणकर यावरून पडलं असावं. सरदार रास्ते यांची कन्या आणि नानासाहेब पेशव्यांच्या पत्नी गोपिकाबाई यांचं माहेर असलेलंवाई भारताच्या परंपरागत विद्या आणि कला यांच्या उपासनेचं क्षेत्र...

मूर्ती, मंदिरं, घाट, उद्यानं, शिल्पं, रंग, चित्रं, वाद्यं, संगीत यांसारख्या ललितकला शिवशाहीपासून इथं भरभराटीला आल्या. सर्व कलागुणांनीयुक्त अशा या नगरीला मुसलमानी राजवटीनं जर्जर केलं होतं. सरदार रास्त्यांनी या नगरीला पुन्हा ऊर्जितावस्था आणली. त्यांनी अनेक विणकरांना इथं आणून वसवले. इथं कापडउद्योगाला फार महत्त्व होतं. डोंगरांच्या कुशीत असल्यामुळं इथली जमीन सुपीक आहे... त्यामुळं शेती हा लोकांचा प्रमुख व्यवसाय आहे. इथं उसाचं आणि हळदीचं पीक घेतलं जातं. इथली पिवळीजर्द हळद सुप्रसिद्ध आहे.

वाई हे गाव पर्यटनासाठी उत्तम आहे. इथले जुने वाडे, घाट आणि मंदिरं बघण्यासारखी आहेत. इथं पंचवीसतीस सुरेख देवळं आहेत. भद्रेश्वर, वाकेश्वर, सिद्धेश्वर, काशीविश्वेश्वर अशी शिवमंदिरं आहेत. वाईमध्ये प्रवेश केल्याकेल्या कृष्णेच्या काठावरचं महागणपती मंदिर लक्ष वेधून घेतं. सुट्ट्यांमध्ये लाखो लोक इथं भेट देतात. इथल्या गणेशमूर्तीत बाळसं आलेल्या बालगणेशाचं रूप आहे. त्याच्यासमोर असलेला काशीविश्वेशवराच्या मंदिरातला नंदी गुळगुळीत आणि चकचकीत अशा काळ्याकुट्ट पाषाणात घडवलेला आहे. त्याच्याभोवती बांधलेला सभामंडप आणि दीपमाळा, दोन्ही लक्ष वेधून घेतात.

असं म्हणतात की, नंदीच्या कानात आपली इच्छा बोलून दाखवली तर ती पूर्ण होते. गणपतीआळीचा घाट हजारभर लोक सहज मावतील एवढा मोठा आहे. गेली दीडशे वर्षं दरवर्षी मे महिन्यात तीस दिवस इथं वसंत व्याख्यानमाला गुंफली जात आहे. तिच्यात अनेक मातब्बर कलाकारांनी आपला कलेचं सादरीकरण केलं आहे. पुण्यामध्ये जसे सवाई गंधर्वसाठी लोकं दुरून येतात तसेच इथंही येतात.

इथला कृष्णामाईचा उत्सव फार प्रसिद्ध आहे. हा उत्सव फेब्रुवारी आणि मार्च महिन्यांच्या दरम्यान असतो. कृष्णा नदीला मातेचा दर्जा दिला आहे. नदीचा उत्सव साजरा करणारं वाई हे एकमेव ठिकाण आहे. प्रतापगडावरल्या अफजलखानच्या भेटीत छत्रपती शिवाजी महाराजांना विजय मिळावा यासाठी तत्कालीन वाईकर ग्रामस्थांनी कृष्णामातेला साकडं घातलं होतं. शिवाजी महाराजांना विजय मिळाला आणि वाईत कृष्णामाई उत्सवाला सुरुवात झाली. त्याप्रमाणे गेली साडेतीनशे–चारशे वर्षांपासून हा उत्सव वाईत साजरा होतो. वाईत नदीकिनारी सात घाट आहेत. या सात फरसबंदी घाटांवर (गल्ल्यांमध्ये) हा उत्सव साजरा होतो. भीमकुंड आळी, मधली आळी, धर्मपुरी, गणपती आळी, ब्राह्मणशाही, रामडोह आळी, गंगापुरी अशा सातही घाटांवर उत्सवाचा कार्यक्रम असतो. पेशवाई पद्धतीच्या मंडपात उत्सवापूर्वी उदकशांत होते. त्यानंतर ढोलताशांच्या गजरात श्री कृष्णामातेच्या मूर्तीची पालखीतून मिरवणूक निघते. दिवाळसणाप्रमाणे सडारांगोळी, पणत्या, फटाके लावून श्रींचं स्वागत केलं जातं. घरोघरी खण, नारळ, साडी आदी ऐच्छिक पद्धतीनं देवीची ओटी भरली जाते. दररोज श्रींच्या मंडपात रुद्राभिषेक, वैदिक मंत्रजागर, भजनकीर्तन, गायनाचे कार्यक्रम, हळदीकुंकू असे अनेक कार्यक्रम होतात. या भव्यदिव्य कार्यक्रमांत वाईमधले सगळ्या जातिधर्मांचे लोक उत्साहानं सामील होतात. नोकरी–उद्योगधंद्यानिमित्त

बाहेरगावी असलेले वाईकर येऊन दर्शन घेतात. श्रींच्या महाप्रसादानं आणि ललिताच्या कीर्तनानं प्रत्येक घाटावरच्या उत्सवाची सांगता होते. सर्व आळीकर उत्साहानं या उत्सवाची सहभागी होतात.

तसेच प्राज्ञपाठशाळा, विश्वकोश या संस्था बघण्यासारख्या आहेत.

सोमवार हा शंकराचा वार म्हणून इथे सोमवारी मोठा बाजार भरतो. आजूबाजूच्या खेड्यापाड्यांतून लोक खरेदीविक्रीसाठी इथं येतात. इथं बाजारहाट करण्यामध्ये खूप आनंद मिळतो. चकचकीत मॉल्सपेक्षा या गरीब लोकांकडून सामान खरेदी केल्याचं समाधान मिळतं. इथं ताज्या भाज्या, फळे, वेगवेगळे मसाले, हळद असं सामान घेण्यासाठी लोकांची झुंबड उडते.

वाईपासून जवळच मेणवलीला नाना फडणीसांचा वाडा बघण्यासारखा आहे. इथून पाचगणी आणि महाबळेश्वर अगदी जवळ असल्यामुळं हजारोंच्या संख्येनं पर्यटक तिथं भेट देतात. वाईपासून जवळच प्रतापगड, रोहितगड, कमळगड, पांडवगड आणि वैराटगड हे किल्ले आणि धोम धरण आहे. भटकंती करणाऱ्या लोकांना या सगळ्या जागा प्रिय आहेत. इथं जाण्यासाठी थंडीचा हंगाम उत्तम. थंडीमध्ये जेव्हा या गावावर धुक्याची दुलई पांघरली जाते तेव्हाचं दृश्य केवळ अप्रतिम. सकाळी लवकर उठल्यावर बैलांच्या गळ्यातल्या घुंगरांचे मधुर स्वर, पक्ष्यांचा किलबिलाट आणि प्रदूषणमुक्त हवा मन प्रसन्न करते. पर्यटकांची वाढती संख्या आणि त्यांच्या गरजा बघून अनेकांनी इथं सुसज्ज हॉटेल्स थाटली आहेत. इथली मिसळ आणि वडापाव प्रसिद्ध आहे पण आजकाल अगदी कॉन्टिनेन्टलसुद्धा मिळतं. अनेक हिंदी आणि मराठी मालिकांचं आणि चित्रपटांचं चित्रीकरण इथं होतं. सध्या डेस्टिनेशन वेडिंग्ज, प्री–वेडिंग शूट्स यांच्यासाठीसुद्धा हे हॉट डेस्टिनेशन आहे.

...मात्र इथं दिवस लवकर मावळतो. रात्री आठनंतर रस्त्यांवर शुकशुकाट असतो... त्यामुळं ज्या लोकांना आराम, उत्तम आरोग्य आणि शांतता प्रिय आहे... त्यांच्यासाठी वाई हे उत्तम डेस्टिनेशन आहे.

## मनातल्या मनात मी

रो. आनंद कुलकर्णी

**मनातल्या मनात मी**

**(कवितावाचन)** **व्हिडीओ इथे पहा**

- सभासदांचा सहभाग वाढावा हा हेतू
- सभासदांच्या कलागुणांना वाव
- चित्रकला, फोटोग्राफी, कथा, लेख, कविता
- व्यक्तिगत, कौटुंबिक, व्यावसायिक गवसणी

तुमचा लेख आवर्जून द्या....
समन्वयक
आनंद कुलकर्णी / यामिनी पोंक्षे

**कलाकारी**

## Appreciation

Rtn. Shruti Gore




I, Rtn. Shruti Gore was appreciated on 19th Foundation day of VIIT held Online on 14th Oct. 2020, in the presence of Mr Neeraj Athalye vice president & Head SAP Customer Experience, SAP India Subcontinent.

Let me explain my teaching journey, in short, I passed out my Bachelors in Civil Engineering in the year 1995, joined a construction company in my home town Khopoli. One of my professors from My Diploma College asked me about part-time teaching. I immediately agreed, it was 11/12/1996 and till date (24 years) I am serving in this ROYAL & LOYAL Profession. Of course, I was not at all passionate about teaching but seeing so many advantages of it – Professional as well as personal, I decided to continue to this profession. Now I love and like this profession a lot, it's only I get an update, be lively and happy with the help of my young and dynamic students.

I am currently working as an Assistant professor in Vishwakarma Institute of Information technology, where our Head of Department, Faculties, Director, Management are very enthusiastic to help us in every need – Teaching as well Research. The Institute has its own appraisal system wherein we have to self-appraise us and it is further approved by higher authorities. Undergoing all these rigorous processes, finally, I was announced as BEST PERFORMANCE IN CIVIL ENGINEERING DEPARTMENT AS A ASSISTANT PROFESSOR.

It gives me an immense pleasure to thank all my fellow Rotarians, friends and family for your wonderful wishes.

## सायकलिंग आणि मी


रो. प्रेसिंडेट सुदर्शन नातू

सायकलिंग आणि मी ऐकण्यासाठी क्लीक करा......

मी आज माझ्या सायकलिंगच्या छंदाविषयी सांगणार आहे. आयुष्यात कधीही सायकल चालवली नाही असा एखादा मनुष्य बघायला मिळणे कठीणच! लहानपणीच्या आठवणींत सायकल ही ९९ टक्के असणारच. मीपण लहानपणी सायकल शिकलो आणि त्यावर खूप गमतीजमती, पडणे या सगळ्या गोष्टीपण झाल्या... पुढे पुण्याला आल्यानंतर घरून सायकलपण आली होती त्यामुळे इंजिनिअरिंग कॉलेजला असताना सायकलने पुण्याभर उंडारत असे. नंतर मात्र सायकल चालवणे बंद झाले. मुंबईला सायकल चालवणे कठीण... त्यामुळे कॉलेजजीवनानंतर सायकल बंद झाली ती झालीच. पुढे आमच्या घरी सायकल आली... ती मिहीरची तीन चाकी आणि तो मोठा झाल्यानंतर शाळेत जाण्याकरता म्हणून दुचाकी घेतली तेव्हा. मी सायकल चालवणे विसरलो तर नाही ना ह्याची खात्री मिहीरला शिकवण्याच्या निमित्ताने करून घेतली होती. त्याचे सायकल शिकणेपण खूप एन्जॉय केले. त्याचे शालेय शिक्षण संपल्यानंतर त्याची सायकल (जी बऱ्यापैकी उत्तम होती) कुलूप लावून पार्किंगमध्ये विराजमान करून ठेवली. त्या सायकलची अवस्था पुढे खराब झाली आणि आता ती भंगारात द्यावी लागणार अशी परिस्थिती निर्माण झाली... परंतु नशिबाने ती वेळ आली नाही. माझा मित्र अजय फाटक हा वर्षानुवर्षे सायकल चालवतो आहे. अगदी कुठलीही मिटिंग असली तरी सायकल! त्याचे मला फार कौतुक वाटते. माझा दुसरा मित्र राकेश मेहता हापण खूप सायकलिंग करतो त्यामुळे त्यांचे फोटो आणि पोस्ट बघून मलाही खूप इच्छा व्हायची. हे दोघेही

बऱ्याच वर्षांपासून माझ्या मागे लागले होतेच की, सायकल चालवायला लाग म्हणून.

रो. किरण पुरोहित प्रेसिडेंट असताना त्या वर्षात फिटनेस फेलोशिप सुरू झाली आणि 'त्या वर्षी सायकल फेलोशिप करू या...' असा विचार रोटेरियन उद्धव गोडबोले याने मांडला. त्यात भाग घ्यावा असे मला वाटले आणि आता सायकल चालवली पाहिजे असा विचार करू लागलो. रो. उद्धव गोडबोले सायकल चालवण्यात तरबेज. तो जवळपास रोज सायकल चालवत आहे आणि त्याने लांब पल्ल्याचे सायकल ट्रेकपण केले आहेत. मी आता सायकल चालवणारच असा निर्धार या सर्व मित्रांमुळे केला आणि तयारीला लागलो. नवीन महाग सायकल घेऊन चार दिवस चालवायची आणि पुढे बंद करून ठेवायची यात मला स्वारस्य नव्हते... त्यामुळे मी आमच्या घरी असलेली सात गिअरची सायकल रिपेअर करायचे ठरवले आणि तिच्यावर खर्च करून ती चालू कंडिशनमध्ये आणून प्रॅक्टीस सुरू केली. जवळपास वीसपंचवीस वर्षे सायकल चालवली नसल्याने सुरुवातीला कठीण गेले... पण चिकाटीने प्रयत्न सुरू ठेवले. सायकल बरीच जड असल्यामुळे चढावर घेऊन जाणे अत्यंत कठीण. जेव्हा त्या सायकलने मी चांदणी चौक चढून संपूर्ण नेकलेस रोड पूर्ण करून आलो तेव्हा मात्र ठरवले की, आता आपण चांगली सायकल घ्यावी आणि त्या दृष्टीने चौकशी सुरू केली. सुदैवाने माझ्या मित्राच्या मुलाची चांगल्यापैकी सायकल उपलब्ध होती... कारण त्याचा मुलगा अमेरिकेत स्थायिक झाला होता. त्याच्याकडून मी ती सायकल विकत घेतली आणि प्रॅक्टीस सुरू केली. या नवीन सायकलीमुळे मी मग सहजपणे प्रवास करू लागलो आणि सायकल चालवणे ही गोष्ट बघता-बघता मला उत्तम जमू आणि आवडू लागली. जवळपास जाण्याकरता मी सायकल वापरू लागलो. आमच्या सकाळच्या ग्रुपमधे बरेच मित्र आहेत. त्यांच्यामध्ये सायकल चालवणे, रनिंग, वॉकिंग असे विविध व्यायाम करणारे मित्र आहेत... त्यामुळे त्यांच्याबरोबर सायकलने भटकंती करायला सुरुवात केली आणि मग अधिकच मजा आली. आता आमचा छान ग्रुप जमला आहे. मागील वर्षी आम्ही लोणावळ्यापर्यंत सायकलने जाऊन आलो... त्यामुळे आत्मविश्वास बराच वाढला. कोरोनामुळे स्विमिंग पूल, जिम आणि सायकल चालवणे बंद झाले... पण व्यायाम नियमित सुरू होता. ऑगस्टमध्ये बाहेर फिरणे आणि टेकडीवर जाणे नियमित सुरू झाले. जेव्हा अनलॉक सुरू झाले त्यावेळी परत सायकलिंग सुरू केले. आमच्या ग्रुपने बीट द एज या स्पर्धेत भाग घेतला. आपल्या वयापेक्षा जास्त किलोमीटर सायकल एका दिवसात चालवणे असे ते आव्हान होते. आमच्या मित्रांपैकी श्री. शिरिष केसकर हे चौसष्ट वर्षांचे असल्यामुळे आम्ही पासष्ट किलोमीटर सायकल चालवण्याचे ठरवले. हे आव्हान २० सप्टेंबरला पूर्ण करायचे होते... त्यामुळे सायकल चालवण्याची प्रॅक्टीस सर्वांनी सुरू केली. सुरुवातीला मी त्या फंदात न पडता टेकडीवर जाणेच पसंत केले पण शेवटी मित्रांच्या आग्रहामुळे २० सप्टेंबरच्या इव्हेंटसाठी तयार झालो आणि दोन दिवस आधी नाव रजिस्टर केले आणि थोडी प्रॅक्टीस केली. सायकलचे ब्रेक जाम झाल्यामुळे प्रथम सर्व्हिसिंग केले आणि एक दिवसाच्या प्रॅक्टीसवर मी २० सप्टेंबरला सर्वांबरोबर पासष्ट किलोमीटर अंतर पार केले आणि त्याचे इ-सर्टिफिकेट मिळवले... त्यामुळे फार आनंद वाटला. त्यानंतर मात्र आठवड्यातून एकदातरी सायकल चालवायची असे ठरवून टाकले आणि मग आम्ही नियमितपणे सायकल चालवायला लागलो. आमचा आवडता रूट म्हणजे नेकलेस रूट जो वीस किलोमीटर आहे. तो बऱ्याच वेळा पूर्ण केला. मग एक दिवस दिवे घाट चढून जायचे आणि विठ्ठलदर्शन घेऊन यायचे असे ठरले आणि निघालो. घाटापर्यंत पोहोचल्यावर, आपण सायकलने वर माथ्यावर जाऊ शकू का याविषयी संभ्रम निर्माण झाला पण आज काहीही करून दिवे घाट चढायचाच असे नक्की ठरवले होते आणि बघता-बघता, न थांबता दिवे घाट चढून वर गेलो! तो जो आनंद होता तो केवळ अवर्णनीय! खाली उतरताना अफाट स्पीडमुळे अधिकच मजा आली. घाटातून खाली आल्यावर मिसळ खाण्यातला आनंद काही औरच होता. नवरात्र जवळ आले आणि नव-रन असे दुसरे चॅलेंज आम्ही स्वीकारले. नवरात्राचे नऊ दिवस आम्ही पंचवीस किलोमीटर रोज सायकल असे रजिस्टर केले... त्यामुळे १७ ऑक्टोबर ते २५ ऑक्टोबर या दिवसांत दिवसभरात कमीत कमी पंचवीस किलोमीटर सायकल चालवायची असे करत होतो. त्याला



कालच नऊ दिवस पूर्ण झाले. या नऊ दिवसांमध्ये तीन वेळा नेकलेस रूट पूर्ण पायी चालणे असे मंगळवार आणि शुक्रवार आम्ही करत होतो... त्यामुळे या दिवशी सायकल दुपारी चालवत असू म्हणजे सकाळी वीस किलोमीटर चालणे आणि दुपारी पंचवीस किलोमीटर सायकलिंग करणे असेपण केले. या नऊ दिवसांत आम्ही रोज साधारणपणे अठ्ठावीस ते पस्तीस किलोमीटर (काही वेळेस जास्त) सायकल चालवली. धमाल मजा आली. वेगळ्या विषयावर गप्पा मारत जाणे, एकमेकांची टिंगलटवाळी करणे, आजूबाजूच्या रम्य परिसराचा आनंद घेणे असे करत आमचा ट्रेक सहज पूर्ण होत होता. पाण्यासाठीचा ब्रेक, त्याचबरोबर चहा आणि एखादवेळी मूड आला तर त्या भागातील काही स्पेशल ठिकाणी खादाडीपण करत होतो म्हणजे फेलोशिप सुरू होती. या नऊ दिवसांत आम्ही नेकलेस, कॅम्प, औंध, हडपसर, सिंहगड रोड, पानशेत अशा विविध भागांत फिरलो आणि मजा केली. नऊ दिवसांत जवळपास दोनशे नव्वद किलोमीटर सायकल चालवून झाली.

मी एवढेच म्हणेन की, प्रत्येकाने रोज काही–ना–काहीतरी व्यायाम नक्की करावा. चालावे, धावावे, योग करावे किंवा सायकलिंग करावे हे नक्की. सकाळच्या वेळी तुम्ही एखादी ॲक्टिव्हिटी केली तर दिवस कसा मस्त जातो... त्यामुळे मी गेली कित्येक वर्षे म्हणजे जवळपास पस्तीस ते चाळीस वर्षे सकाळी काही–ना–काहीतरी व्यायाम करतोच. स्विमिंग हा आवडीचा आणि रोजचा व्यायाम. आमच्या सायकल चालवण्याच्या ग्रुपमधे श्री. शिरीष केसकर, श्री. प्रशांत कुलकर्णी, श्री. प्रसाद कडोलीकर आणि श्री. श्रीनिवास हिंगणे सामील होते. त्यांचे आभार. आता बघू पुढचा टप्पा कुठला ते!

तुम्हाला माझ्या सायकल भटकंतीची गोष्ट आवडली असेल अशी अपेक्षा करतो. आपल्या क्लबमध्येसुद्धा काहीजण सायकलिंग करतात... त्यामुळे क्लबची सायकल फेलोशिप नक्की होऊ शकेल.

चला तर मंडळीऽ आपापली सायकल रिपेअर करा आणि लवकरच सायकल फेलोशिपसाठी तयार व्हा.

मला सायकल चालवण्याकरता प्रेरणा देणाऱ्या मित्रांना समर्पित!

२५–१०–२०२०

## विशेष

- **शुभेच्छा**
- **स्मृती**
- **गवसणी**
- **या महिन्यात मागच्या वर्षांत...**

**तुमचा लेख आवर्जून द्या...**
**समन्वयक**
**श्वेता करंदीकर**

## टीम बुलेटिन

## सदरं

- **मुखपृष्ठ ........................श्वेता............. विधानं/ कोट्स**
- **संपादकीय/ अध्यक्षीय........योगेश /सुदर्शन**
- **रोटरी.........................योगेंद्र / अभिजित.............. रोटरी मंच/RI**
- **डिस्ट्रिक कनेक्ट..........योगेंद्र / अभिजित........ डिस्ट्रिक घडामोडी**
- **क्लबकारी........................आनंद / यामिनी..........क्लब घडामोडी**
- **कलाकारी........................आनंद / यामिनी..........सभासद गुणदर्शन**
- **दृष्टीकोन......................योगेंद्र / अभिजित..........पुस्तक, चित्रपट इ.**
- **विशेष...........................श्वेता...................शुभेच्छा, स्मृती**

- **क्रिएटिव्ह असिस्टन्स आणि कोऑर्डिनेशन..........टीम सहयोगी**